


हसत खेळत अन्यायाचा प्रतिकार करणारे स्वतंत्र विचाराचे हिरक महोत्सवी दैनिक

# ललकार

संस्थापक संपादक - स्व. बापूराव द. खराडे

सांगली | कोल्हापूर | सिंधुदुर्ग | सोलापूर | सातारा | पुणे | मुंबई | बेळगांव | विजापूर जिल्ह्यात एकावेळी प्रकाशित होणारे दैनिक

स्थापना १९५४
72 YEARS
अमृतमहोत्सवी वाटचाल




•Regd. No. SGL/46/2024-2026 •R.N.I. MAHMAR /1996/07711 • वर्ष ७२ : अंक २७ वा **सांगली** • रविवार दि.२७ एप्रिल २०२५ • पाने ८ • किंमत ६ रुपये मोबा.नं.९८२३१४७४५८

# भारतासमोर पाकिस्तानचा १ दिवसही निभाव लागणार नाही

नवी दिल्ली, दि.२६ (वृत्तसंस्था) - पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर भारताने कठोर निर्णय घेत सिंधू जल करार रद्द केला आहे. या निर्णयांमुळे हताश झालेले पाकिस्तानचे नेते सतत युद्धाबाबत बोलत आहेत. मात्र, अशा अनेक मुद्द्यांवरून धमक्या देणाऱ्या पाकिस्तानचा भारताकडून पराभव होत आहे. मग ती आर्थिक ताकद असो वा परकीय चलन चलनसाठा. महत्वाच्या ७ क्षेत्रात भारताने पाकिस्तानवर मोठी आघाडी मिळवली आहे.

भारताचा जीडीपी, शेअर बाजार आणि जागतिक स्थिती सातत्याने मजबूत होत असताना, पाकिस्तान कर्ज आणि गरिबीच्या गर्तेत बुडाला आहे. पण कदाचित हे आकडे काय सांगत आहेत, हे वाईट हेतू असलेल्या पाकिस्तानच्या नेत्यांना माहीत नसेल. अशा स्थितीत पाकिस्तानचे काही नेते युद्धाची भाषा करत आहेत.

आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळं पाकिस्तानचे लोक आधीच मदत मागत आहेत. २०२४ मध्ये पाकिस्तानमधील सरासरी चलनवाढीचा दर सुमारे २४ टक्के होता, जो जगातील सर्वोच्च दरांपैकी एक आहे. खाण्यापिण्यासाठी लोकांची धडपड सुरु आहे. अनेक ठिकाणी रेशन दुकाने लुटल्याचे बातम्या समोर येत आहेत. त्या तुलनेत, भारतातील किरकोळ

## युद्धाच्या बाता मारणाऱ्या पाकिस्तानच्या खरे वास्तव?

चलनवाढीचा दर फक्त ४ टक्के इतकाच राहिला आहे. जे स्पष्टपणे दर्शवते की भारताची आर्थिक धोरणे अधिक स्थिर आणि मजबूत आहेत. जो देश महागाईने रोज मरत आहे, तो देश युद्धात स्वतःहून १० पट अधिक शक्तीशाली देशाशी लढण्याचा विचारही कसा करु शकतो?

आर्थिक आघाडीवर पाकिस्तान भारताशी बरोबरी करस शकत नाही. आज भारताचा ऋड्ढ सुमारे ३.७ ट्रिलियन डॉलर आहे. भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. तर पाकिस्तानचा जीडीपी



फक्त ३४० अब्ज डॉलर आहे. हा फरक पाकिस्तान ज्या भयंकर गरिबी आणि आर्थिक संकटातून जात आहे ते दाखवतो. भारत जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनत असताना पाकिस्तान कर्जासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांचे दरवाजे ठोठावत आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही पाकिस्तान भारतापेक्षा खूपच मागे आहे. णछएडउज च्या २०२५ च्या अंदाजानुसार, भारतात प्रौढ साक्षरता दर सुमारे ७६.३२ टक्के आहे. तर पाकिस्तानमध्ये हा दर फक्त ५९.१३ टक्के आहे. भारत आपल्या जीडीपीच्या ४.५ ते ४.८ टक्के शिक्षणावर खर्च करतो, तर पाकिस्तान फक्त २.९ टक्के खर्च करु शकतो. उत्तम शिक्षण प्रणाली भविष्यात भारताला अधिक शक्तिशाली बनवत आहे तर पाकिस्तान आपल्या पुढच्या पिढीला पुरेशी संसाधने आणि संधी प्रदान करण्यात अपयशी ठरत आहे.

भारताचे संरक्षण बजेट सध्या ७८.७ अब्ज डॉलर्स आहे, तर पाकिस्तानचे संरक्षण बजेट केवळ ७.६ अब्ज डॉलर्स आहे. म्हणजे भारताचे लष्करी बजेट पाकिस्तानच्या तुलनेत जवळपास दहापट जास्त आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की भारताकडे अधिक आधुनिक शस्त्रे, उत्तम प्रशिक्षण सुविधा आणि मजबूत लष्करी यंत्रणा आहे. भारताशी स्पर्धा करण्यासाठी पाकिस्तानकडे संसाधनांची तीव्र कमतरता आहे.

आरोग्याच्या क्षेत्रातही पाकिस्तानची स्थिती अत्यंत दयनीय आहे. भारत त्याच्या आरोग्य क्षेत्रावर त्याच्या ऋड्ढ च्या सुमारे ४ टक्के खर्च करत आहे, तर पाकिस्तानचा एकूण आरोग्य खर्च २.९ टक्के आहे. त्यावर सरकारी खर्च फक्त १.२ ते १.५ टक्के आहे. याचा अर्थ पाकिस्तानमधील आरोग्य सेवांची स्थिती अत्यंत वाईट आहे. कोविड नंतर भारताने आपल्या आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या जलद सुधारणांचे आता जागतिक स्तरावर कौतुक होत आहे.

परकीय चलन साठ्याचा विचार केला तर पाकिस्तानची स्थिती अत्यंत वाईट आहे. भारताकडे सध्या परकीय चलनाचा साठा सुमारे ६७८ अब्ज डॉलर आहे, ज्यामुळे तो जागतिक आर्थिक धक्क्यांपासून स्वतःचे संरक्षण करू शकतो. त्या तुलनेत पाकिस्तानकडे केवळ ८ अब्ज डॉलर्स ⏩ पान ७ वर

## सांगलीत दूचाकी चोरट्यास अटक

। ललकार वृत्त ।

सांगली, दि.२६ (प्रतिनिधी) - विश्रामबाग पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेने दुचाकी चोरटा रामा विठोबा करांडे (वय ४३, रा. विजयनगर, सांगली) याला अटक केली. त्याच्याकडून सिव्हिल हॉस्पिटल सांगली आणि कऱ्हाड शहरातून चोरलेली दुचाकी जप्त केली.

विश्रामबाग ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक रात्री पेट्रोलिंग करत असताना रामा करांडे हा सिव्हिल हॉस्पिटल परिसरात चोरलेली दुचाकी घेऊन फिरताना कुंभार मळा परिसरात आढळला. त्याला संशयावरून ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याने सिव्हिलसमोरून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. चौकशीत त्याने कऱ्हाड शहरातूनदेखील ⏩ पान ७ वर

## सांगली सिव्हिलला हरित न्यायालयाचा ४.६० कोटींचा दंड

। ललकार वृत्त ।

सांगली, दि.२६ (प्रतिनिधी) - सांगली व मिरज शासकीय रुग्णालयातून सांडपाणी प्रक्रिया करता सोडून प्रदूषण केल्याबद्दल ४ कोटी ६२ लाख ६० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. सांगली रुग्णालयाला दंड भरण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. हरित न्यायालयाने हा आदेश दिला.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते रवींद्र



वळवडे यांनी हरित न्यायालयात रुग्णालयांच्या प्रदूषणाविरोधात याचिका दाखल केली होती. त्यांच्यावतीने ड. ओंकार वांगीकर यांनी बाजू मांडली. मिरज रुग्णालयाने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या उभारणीचे काम सुरु केल्याचे सांगितले, त्यामुळे या रुग्णालयाचा दंड तूर्त स्थगित करण्यात आला आहे. मात्र तेथे दोन वर्षांत प्रकल्पाची उभारणी करायची आहे.


सांगली रुग्णालयाला मात्र दोन महिन्यांत दंडाची रक्कम भरायची आहे. वळवडे यांनी याचिकेत म्हटले होते की, सांगली व मिरज शासकीय रुग्णालयांतील ⏩ पान ७ वर

## बेकायदेशीर गॅस रिफिलींग अड्ड्यावर छापा

। ललकार वृत्त ।

सांगली, दि.२६ (प्रतिनिधी) - मिरजेतील मालगाव रोडवरील खोतनगर येथे बेकायदा गॅस रिफिलिंग अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा मारला. यावेळी अभिजित विलास लोहार (वय ३१) याला अटक केली. त्याच्याकडून पाच सिलिंडर, इलेक्ट्रिक मोटार, पाईप असा २२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिस अधीक्षक संदीप घुगे व अपर अधीक्षक रितू खोखर यांनी गुन्हे अन्वेषणच्या पथकाला बेकायदा गॅस रिफिलिंग अड्ड्यांवर छापे मारण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गुन्हे अन्वेषणचे एक पथक कारवाईसाठी सज्ज केले होते. सहायक निरीक्षक नितीन सावंत यांच्या पथकातील कर्मचारी अनंत कुडाळकर ⏩ पान ७ वर




## भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्यावतीने डॉ. तारा भवाळकर यांचा जीवनसाधना गौरव पुरस्काराने सन्मान

। ललकार वृत्त ।

पुणे, दि.२६ (वार्ताहर) - भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम हे दृष्टीसाक्षेपी द्रष्टे विचारवंत होते. पदवीच्या जोडीला आवश्यक सामाजिक शहाणपण त्यांच्याकडे असल्याने सहकारातून शेती, शिक्षण, आर्थिक, वैचारिक आणि सांस्कृतिक विकास साधत त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत, असे गौरवोद्गार ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी काढले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वतीने देण्यात येणारा जीवनसाधना गौरव पुरस्कार डॉ. तारा भवाळकर यांना प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. मानपत्र आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचा ३० वा स्थापना दिन कार्यक्रमात डॉ. भवाळकर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा य समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे कार्यवाह, प्र-कुलगुरू आमदार डॉ. विश्वजीत कदम, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कुलसचिव जी. जयकुमार, भारती विद्यापीठ आरोग्य विज्ञान विभागाच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, ⏩ पान ७ वर

## एलईडी दिव्यांच्या प्रकल्प तोट्याचा ठरणार

### सांगली महापालिकेचे कोट्यवधी रूपये बुडणार

। ललकार वृत्त ।

सांगली, दि.२६ (प्रतिनिधी) - महापालिका क्षेत्रातील एलईडी दिव्यांच्या प्रकल्पासाठी 'समुद्रा' कंपनीला दरवर्षी ३५ कोटी रुपयांप्रमाणे १५ वर्षांत ५०० कोटी रुपये देण्याचा निर्णय तोट्याचा असल्याचे मत आयुक्त सत्यम गांधी यांनी व्यक्त केले. कंपनीशी केलेल्या कराराचा सखोल व कायदेशीर अभ्यास करून अंतिम निर्णय घेण्यात येईल. तसेच मुदतीत दिवे न बसविल्याने तसेच इतर तक्रारीमुळे 'समुद्रा' कंपनीला दंडात्मक कारवाईची नोटीस बजावण्यात येईल, ⏩ पान ७ वर

## सनमडी येथील आश्रमशाळेतील लैंगिक अत्याचारप्रकरणी मुख्याध्यापक निलंबीत

। ललकार वृत्त ।

जत, दि.२६ (वार्ताहर) - सनमडी (ता. जत) येथील आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने लैंगिक शोषण केल्याची घटना उघडकीस आली असून लैंगिक अत्याचारप्रकरणी सनमडीच्या आश्रमशाळेतील मुख्याध्यापकावर निलंबनाची कारवाई केली आहे. त्याचबरोबर उमदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

या आश्रमशाळेतील शिक्षकांची समाजकल्याण खात्याकडून आणि महिला व बालविकास विभाग यांच्याकडून शुक्रवारी दिवसभर पोलिस बंदोबस्तात चौकशी सुरू होती. या आश्रमशाळेतील शिक्षकाने सात मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा प्रकार गुरुवारी दुपारी उघडकीस आला.

बुधवार दि. २३ रोजी आश्रमशाळेला सुट्टी होती. या आश्रमशाळेतील मुलींना घरी सोडण्यासाठी करेवाडी (ता. जत) येथे आश्रमशाळेची बस घेऊन गेली होती. ज्या शिक्षकाने लैंगिक अत्याचार केला होता. तोही शिक्षक, चालक व महिला शिक्षिका सोबत होती. या मुली घरी गेल्यानंतर लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती नातेवाइकांना दिली. लगेच नातेवाइकांनी त्या शिक्षकास मारहाण केली. तसेच चालकासही मारहाण केली. एक महिला शिक्षिकेने ⏩ पान ७ वर

## अंकली टोलनाक्याजवळ कंटेनर पलटी

। ललकार वृत्त ।

जयसिंगपूर, दि.२६ (वार्ताहर) - उदगाव जवळ अंकली टोल नाका शेजारी नवीन कोल्हापूर बायपास रोडवर सिमेंट कॉंक्रीटचे कच्चे रसायन घेऊन जाणारे मिक्सर कंटेनर पलटी झाल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली या घटनेमध्ये कोणतीही जीवितहानी नाही मात्र



चालक जखमी झाला आहे . याच ठिकाणी या मार्गावर कंटेनर पलटी होण्याची महिन्यात दुसरी घटना घडल्याने ⏩ पान ७ वर

## प्रसूतीच्या वेळेस महिलेचा मृत्यूप्रकरणी डॉक्टरला २ वर्षे सक्तमजुरी

। ललकार वृत्त ।

विटा, दि.२६ (वार्ताहर) - प्रसूतीच्या वेळेस महिला रुग्णाच्या उपचारात निष्काळजीपणा करुन तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी खानापूर येथील डॉ. उदयसिंह विजयसिंह हजारे (वय ४९, रा. खानापूर) यांना विटा न्यायालयाने दोन वर्ष सक्तमजुरी व २५ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

रांजणी (ता. कवठेमहांकाळ) येथील सविता संदीप पवार (वय २३) या महिलेला प्रसूतीकळा सुरू झाल्या. त्यामुळे तिला दि. ११ नोव्हेंबर २०१७ रोजी दुपारी करंजे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृती जास्तच नाजूक झाल्याने नातेवाइकांनी तिला खानापूर येथील हजारे हॉस्पिटल येथे दाखल केले . प्रसूतीकळा सुरू असताना उपलब्ध सुविधा व आवश्यक कौशल्य यांचा विचार करून योग्यवेळी तिला पुढील उपचारकामी दुसऱ्या सर्व सोयींनी युक्त रुग्णालयात पाठवणे आवश्यक होते.

मात्र, डॉ. उदयसिंह हजारे यांनी तिला दुसऱ्या रुग्णालयात पाठविले नाही. परिणामी त्यांनी उपचारात निष्काळजीपणा दाखविला. त्यामुळे पुढील उपचारासाठी सांगलीतील शासकीय रुग्णालयात पोहोचण्यास उशीर झाल्याने तिथे व्यवस्थित व वेळेत उपचार मिळाले नाहीत. त्यामुळे तिचा मृत्यू झाला.

या खटल्याच्या सुनावणीदरम्यान गुरुवारी विटा न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व न्यायाधीश शेख यांनी डॉ. उदयसिंह विजयसिंह हजारे यांना २ वर्षे सक्तमजुरी आणि २५ हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास आणखी एक महिने साधी कैद, अशी शिक्षा सुनावली. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक पी. के. कण्हेरे यांनी केला होता. सरकार पक्षाच्यावतीने ड. एस. एस. यादव व ड. व्ही.एस. कोकाटे यांनी काम पाहिले.

याप्रकरणी संबंधित डॉक्टरांवर नातेवाइकांनी हलगर्जीपणाबद्दल तक्रार दाखल केली. या प्रकाराची जिल्हा शल्यचिकित्सक आणि सांगलीतील शासकीय रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या दि.२६ मार्च २०१९ रोजीच्या अहवालानुसार डॉ. उदयसिंह हजारे यांच्या विरोधात विटा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यासाठी चौकशी समितीचा अहवाल निर्णायक ठरला आहे.

सहावे पुण्यस्मरण

स्व. दानचंदजी खिवराजजी घोडावत
यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त

सुरु आहे वाटचाल तुमच्या आशीर्वादाने
जीवन पथावर चालत राहू
तुमच्या आदर्श संयमाने
सदैव जपतो आम्ही तुमच्या आदर्श व स्मृतीला
आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली

विनम्र अभिवादन!



जन्म दि.१५/९/१९३५ मृत्यू दि. २७/४/२०१९

घोडावत परिवार, जयसिंगपूर, सांगली
श्री. दानचंदजी घोडावत फॅमिली चॅरिटेबल ट्रस्ट, जयसिंगपूर

# मुघलांच्या खुणा असलेल्या गावांची नावे बदलण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार

## गोपीचंद पडळकर

। ललकार वृत्त ।

सांगली दि. २६ (प्रतिनिधी) – सर्वधर्मसमभाव ही हिंदूंना दिलेली अफूची गोळी आहे. यातून पहिले हिंदूंनी बाहेर पडायला हवे. सर्वधर्मसमभाव पाळण्याची जबाबदारी फक्त हिंदूंची आहे का? हिंदू मुस्लिम भाई भाई असे म्हटले जाते; मग जम्मू-काश्मीरमध्ये धर्म विचारून का फक्त हिंदू लोकांवर गोळ्या घातल्या गेल्या? असा सवाल भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलाय.

तसेच मुघलांच्या खुणा असलेल्या आणि त्या पुसण्याच्या दृष्टिकोनातून सांगली जिल्ह्यातील काही गावाची नावे बदलण्याची आणि पूर्वीची नावे या गावांना देण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार गोपीचंद पडळकर करणार आहेत. यामध्ये खानापूर शहराचे नाव भवानीपूर करावे, सुलतानगादे या गावाचे देखील नाव बदलावे, जत तालुक्यातील उमदी गावाचे नाव देखील बदलावे अशी मागणी आमदार पडळकर यांनी केलीय.

खानापूर शहरातील महादेव मंदिरातील विटंबना झालेल्या नंदीच्या मूर्तीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाजाकडून आज महादेव मंदिरात आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते आरती संपन्न झाली. यावेळी पडळकर यांनी या कृत्यामागे जो



कुणी आहे? त्याला पोलीस विभाग अटक करेल आणि शिक्षा देईल असे सांगितले. पत्रकारांशी बोलताना गोपीचंद पडळकर म्हणाले की, मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देत आहे की, खानापूर शहराचे नाव भवानीपूर करावे, सुलतानगादे या गावाचे देखील नाव बदलावे, जत तालुक्यातील उमदी गावाचे नाव देखील बदलावे. मुघलांच्या खुणा जिथे असतील, त्या पुसण्याच्या दृष्टिकोनातून जे काही पूर्वीचे नाव आहेत, ती पूर्वीचे नाव देण्यात यावी, अशी मागणी मी करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या सगळ्या बाबींचा विचार करून नक्की निर्णय घेतील असे त्यांनी सांगितले.

गोपीचंद पडळकर पुढे म्हणाले की, पूर्वीच्या लोकांनी षडयंत्र केले. हिंदी-चिनी भाई भाई, हिंदू-मुस्लिम भाई भाई. मग भाई भाई असताना काश्मीरमध्ये हा प्रकार का घडला? हिंदू मुस्लिम भाई भाई आहेत तर तुम्ही धर्म विचारून का आमच्या भावांना गोळ्या घातल्या. काही लोकांनी कलमा पढल्यानंतर सुद्धा त्यांचे कपडे उतरवून बघितले. त्यानंतर गोळ्या घालण्यात आल्या हा काय प्रकार आहे? सर्वधर्मसमभाव ही हिंदूंना दिलेली अफूची गोळी आहे. यातून पहिल्यांदा हिंदूंनी बाहेर पडावे. हे फक्त हिंदूंसाठीच लागू होत नाही. सर्वधर्मसमभाव फक्त हिंदूंनी बघायचा मग बाकीच्यांनी का बघायचा नाही? काश्मीरमधल्या पंडितांना कोणी घालवले? तिथे काय पाकिस्तानचे मुसलमान आले होते का? त्यांच्या गल्लीत राहणाऱ्या लोकांनीच त्यांना घालवले. तिथे कोणी पाकिस्तानी माणूस आला नव्हता, असा प्रतिक्रिया त्यांनी पहलगामच्या हल्ल्यावर दिली आहे.

# सांगली मराठा समाजचे अध्यक्ष संभाजीराव पाटील-सावर्डेकर यांचे निधन

। ललकार वृत्त ।

सांगली दि. २६ (प्रतिनिधी) – मराठा समाज (सांगली) चे अध्यक्ष पै. संभाजीराव (तात्या) पाटील सावर्डेकर (वय ८३, मूळ गाव, सावर्डे, ता. तासगाव) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. रक्षा विसर्जन सोमवारी (ता.२८) सकाळी नऊ वाजता येथे अमरधाम स्मशानभूमीत आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भारतीय ज्योतिरामदादा पाटील-सावर्डेकर यांचे पुतणे व माजी खासदार खासदार संजय (काका) पाटील यांचे मामा होत. पै. संभाजीराव (तात्या) पाटील-



सावर्डेकर यांनी राजकीय, सांस्कृतिक, कला व क्रीडा क्षेत्रांत आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला. वसंतदादा पाटील सहकारी साखर कारखान्याचे ते काही काळ उपाध्यक्ष होते. भोसले व्यायाम शाळा (सावर्डेकर तालीमच) अध्यक्ष म्हणून काम पाहत होते. २३ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची मराठा समाजचे अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. भोसले व्यायाम शाळा येथून त्यांनी कुस्ती कारकीर्दीची सुरु केली. त्यांनी बी. ए., एल.एल.बी. पर्यंत शिक्षण घेतले. पण खऱ्या अर्थानं रंगले ते कुस्ती आखाडा, शेती, राजकारण आणि समाजकारणात. सलग दोन वेळा त्यांनी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनात महाराष्ट्र चॅम्पियन सन्मानासह मिळवले.

अखिल भारतीय विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय पदक मिळवले होते. कुमार भारत केसरी स्पर्धेत आशियायी सुवर्णपदक विजेता कर्तारसिंगशी टक्कर देत राष्ट्रीय कुतीपटूंचे लक्ष वेधून घेतले. दिग्गज नेते यशवंतराव चव्हाण व संजय गांधी यांनी त्यांचे कौतुक केले होते. 'कुंकू माझं भाग्याचं', 'गनिमी कावा', 'धरतीची लेकर' या गाजलेल्या मराठी चित्रपटांत भूमिका केली होती. घोटीव शरीर, लाल पिळदार पोलादी... या गीतातील नायक 'अमृता मगर. 'वसंत केसरी' नावाने कुस्ती स्पर्धा सुरु करून ग्रामीण भागातील नवोदित मल्लांना त्यांनी व्यासपीठ मिळवून दिले. तात्यांच्या मार्गदर्शनाखाली भोसले व्यायाम शाळेत अनेकजण महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मल्ल घडले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत यश मिळवणाऱ्या शाळांचा गौरव

## इस्लामपूर व साखराळे केंद्राच्या शिक्षण परिषदेत शैक्षणिक उपक्रमांवर चर्चा

। ललकार वृत्त ।

इस्लामपूर दि. २६ (वार्ताहर) – इस्लामपूर व साखराळे केंद्राची शिक्षण परिषद येथील विद्यामंदिर हायस्कूल मध्ये वेगवेगळया शैक्षणिक उपक्रमांवर चर्चा करत उत्साहात पार पडली.

वाळवा शिक्षण संस्थेचे सहसचिव ड. धैर्यशील पाटील, केंद्रप्रमुख पोपटराव जाधव प्रमुख उपस्थित होते.

यावेळी निपुण महाराष्ट्र अभियान अध्ययन स्तर नोंदी चॅटबॉटवर भरणे व भाषा कृतींचा बुधवार व गणित कृतींचा गुरुवार या उपक्रमाचा विद्यार्थी उपचारात्मक अध्यापन प्रक्रियेत उपयोग करणे याबाबत चर्चा करण्यात आली. एस पी. लोहार, एस. व्ही. जाधव व डी. एस. माळी यांनी यावेळी मार्गदर्शन केले.



येथील शिक्षण परिषदेत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात दोन लाखांचा पुरस्कार मिळवणाऱ्या सद्गुरु आश्रमशाळेचा सन्मान करताना ड.धैर्यशील पाटील,केंद्रप्रमुख पोपटराव जाधव मुख्याध्यापक संजय पाटील,आष्पाक आत्तार

एस. एम. भोसले यांनी कृती कार्यक्रमाचे वर्ग स्तरावरील नियोजन व सुट्टीच्या कालावधी मधील अध्ययनस्तर अंमलबजावणी बाबतचे कार्य याबाबत मार्गदर्शन केले.

प्रा. विजयकुमार शिंदे यांनी विद्यांजली पोर्टलवर सर्व शाळांची त्यांच्या गरजेनुसार प्रकल्प नोंदणी व पॅट संकलित चाचणी गुण चॅटबॉट लिंक वर भरणे याबाबत मार्गदर्शन केले.

केंद्र तसेच तालुकास्तरावर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यामंदिर हायस्कूल,द्वितीय क्रमांक मिळवलेले सद्गुरु आश्रमशाळा व तृतीय क्रमांक मिळवलेले उर्दू शाळा इस्लामपूर यांचे सह केंद्र स्तरावर क्रमांक मिळवलेल्या शाळांचा गौरव करण्यात आला. एस. एल.पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.मुख्याध्यापक सचिन पाटील, आष्पाक आत्तार,जे.टी. पवार, दत्तात्रय पाटील, संतोष पवार, अनिल पाटील यांचे सह इस्लामपूर व साखराळे केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते. सौ. इरफान संदे यांनी आभार मानले.

# मिरजेत आ. डॉ. सुरेशभाऊ खाडे यांच्या शुभहस्ते स्वामी समर्थ केंद्राच्या विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

। ललकार वृत्त ।

मिरज दि. २६ (वार्ताहर) – मिरजेतील प्रभाग क्रमांक सात मध्ये वंटमुरे कॉर्नर जवळ आरवटगी पेट्रोल पंपाच्या मागे असलेल्या श्री स्वामी समर्थ केंद्रात पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे व संरक्षक भिंत बांधणे या विकासकामांचा शुभारंभ माजी पालकमंत्री मिरजेचे लोकप्रिय आमदार डॉ. सुरेशभाऊ खाडे यांच्या शुभहस्ते शनिवारी सकाळी संपन्न झाला. या कामासाठी आ. डॉ. सुरेशभाऊ खाडे यांनी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करून आणला असून या कामाची सुरवात आज करण्यात आली. यामुळे श्री स्वामी समर्थ भक्तांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण आहे.



या भूमिपूजन कार्यक्रमास ज्येष्ठ नेते सुरेश बापू आवटी, माजी नगरसेवक गणेश माळी, माजी महापौर सौ. संगीता खोत, माजी उपमहापौर आनंदा देवमाने, माजी नगरसेवक पांडुरंग कोरे, माजी नगरसेविका गायत्री कुल्लोळी, भाजप जिल्हा सरचिटणीस मोहन वाटवे, भाजप मंडल अध्यक्ष चैतन्य भोकरे, यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुरेश पाटील यांना पत्नी वियोग



सांगली . दि. २७ – सांगलीचे माजी महापौर व ए बी पाटील इंग्लिश स्कूल चे चेअरमन सुरेश आदगोंडा पाटील यांच्या सुविद्य पत्नी सौ . जयश्री पाटील यांचे शनिवार दि. २६ एप्रिल राजी आकस्मिक दुःखद निधन झाले . एक सात्विक आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणून त्या परिचित होत्या .त्यांच्या मागे पती सुरेश पाटील , दोन मुले , एक मुलगी , सून आणि नातवंडे असा परिवार आहे ..सौ जयश्री यांच्या अचानक जाण्याने पाटील कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणाचे रक्षण करा

## धनंजय देशमुख; माझी वसुंधरा अभियान ५ अंतर्गत कडेगांव तलावाची स्वच्छता

। ललकार वृत्त ।

कडेगाव दि. २६ (वार्ताहर) – वृक्षारोपण, जल व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन करून शाळा महाविद्यालयांमध्ये जनजागृती



करून प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणाचे खऱ्या अर्थाने रक्षण करावे असे आव्हान कडेगाव नगरपंचायतीचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख यांनी केले. ते माझी वसुंधरा अभियान ५.अंतर्गत नेर्ली कडेगांव तलावाची स्वच्छता उपक्रमावेळी बोलत होते. यावेळी कडेगाव चे उपनगराध्यक्ष पै. अमोल डांगे, सार्व.बांधकाम सभापती निलेश लंगडे, मुख्याधिकारी डॉ. पवन म्हेत्रे प्रमुख उपस्थित होते.

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त नेर्ली तलावातील प्लास्टिक व काचेच्या बाटल्या, प्लास्टिक, पिशव्या, कापड, बारदाने यासारखा कचरा गोळा करण्यात आला.यास्वच्छता मोहिमेत कडेगाव नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक, नगरसेविका, सर्व सभापती नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.


## जाहीर समन्स

मा. सहाय्यक निबंधक सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. सांगली

श्री गणेश नागरी सह. पतसंस्था मर्या; आष्टा – अर्जदार

विरुद्ध

| अ. क्र. | दावा क्रमांक | जाबदाराचे नांव | दावा रक्कम | पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५४३ २४-२५ | शफीक मकबूल कुरणे | २१०११५९/- | रा. मिरज, ता. मिरज. जि. सांगली |
| २ | ५९२ २४-२५ | रविंद्र नंदकुमार फाळके | १००८११/- | रा. पलूस ता.पलूस, जि. सांगली |

यातील अ.क्र. १ ते २ जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येत आहे की, ज्या अर्थी अर्जदार संख्येने १ ते २ मधील जाबदार विरुद्ध महाराष्ट्र सहकारी सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये कर्ज वसुली दाखला मिळणेबाबत अर्ज केला आहे. आणि ज्या अर्थी जाबदार यांच्या पत्त्यावरती रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठवूनही अपुरा पत्ता, पत्ता सोडून गेले, परगावी या शेऱ्याने परत आलेले आहे. या अर्थी अ.क्र. १ ते २ मधील जाबदार यांना सदर दाव्यासंबंधी लेखी तोंडी म्हणणे सादर करणेसाठी अंतीम संधी म्हणून दिनांक १६/०५/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता खालीलप्रमाणे पत्त्यावर हजर रहावे.

सदर दिवशी हजर न राहिलेस आपणास काही सांगावयाचे नाही असे समजून तुमचे गैरहजेरीत दाव्याची सुनावणी केली जाऊन निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर समन्स दि. २५/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिला आहे.

(शिक्का)

स्थळ–सांगली
दिनांक : २५/०४/२०२५

सही/–
**उर्मिला राजमाने**
**सहाय्यक निबंधक**
सांगली जिल्हा नागरी सह.
पतसंस्था फेडरेशन लि; सांगली.

**सुनावणीचे ठिकाण :–**
**सहाय्यक निबंधक**, सांगली जिल्हा नागरी सह. पतसंस्था फेडरेशन लि; सांगली. खोली नं. २१० चे उत्तर बाजूस, २ रा मजला, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली–मिरज रोड, विजयनगर, सांगली.मिरज रोड, विजयनगर, सांगली.

## जाहीर समन्स

महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये
सहाय्यक निबंधक, सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि; सांगली

वसुली दाखला अर्ज क्र. १५६०/२४-२५ दिनांक २५/०४/२०२५

**श्री चौंडेश्वरी ग्रा.बि.शेती पतसंस्था मर्या; पलूस** | अर्जदार

विरुद्ध

१) धिरज अशोक घोरपडे
मु.पो. कासारवाडा, पलूस, जि. सांगली. | जाबदार

**दावा अर्ज रुपये :– ९३,२१४/–**

वरील जाबदार क्र. २ यांना जाहीर समन्सने कळविणेत येते की, दावा दाखल झालेनंतर नेमलेल्या सुनावणी तारखेस उपस्थित राहून म्हणणे मांडणेकामी रजिस्टर पोष्टाव्दारे नोटीस पाठवूनही लागू झालेली नाही. सबब या जाहीर नोटीसव्दारे वरील जाबदार याना कळविण्यात येते की, सदर दाव्यासंबंधी लेखी व तोंडी म्हणणे मांडणेसाठी दिनांक १६/०५/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता तारीख व वेळ नेमलेली आहे. याची नोंद घ्यावी. सदर तारखेला हजर न राहील्यास तुमचे गैरहजेरीत चौकशी करुन निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

सही/–
**उर्मिला राजमाने**
**सहाय्यक निबंधक**
सांगली जिल्हा नागरी सहकारी
पतसंस्था फेडरेशन लि; सांगली.

**सुनावणीचे ठिकाण :–**
**सहाय्यक निबंधक**, सांगली जिल्हा नागरी सह. पतसंस्था फेडरेशन लि. सांगली. खोली नं. २१० चे उत्तर बाजूस, २ रा मजला, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली–मिरज रोड, विजयनगर, सांगली.

## जाहीर समन्स

मा. सहाय्यक निबंधक सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. सांगली

**कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सह.पतसंस्था मर्या; सांगली, शा.–पलूस.** – अर्जदार

विरुद्ध

| अ. क्र. | दावा क्रमांक | जाबदाराचे नांव | दावा रक्कम | पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १६९३ | प्रविण संपत सुर्यवंशी | २००६०५/- | विजयनगर,मु.पो.येळावी ता.तासगांव,जि. सांगली |
| २ | १६९४ | अरुण जयकर माळी | १८०१०६/- | मु.पो.पलूस ता.पलूस, जि. सांगली |

यातील अ.क्र. १ ते २ जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येत आहे की, ज्या अर्थी अर्जदार संख्येने १ ते २ मधील जाबदार विरुद्ध महाराष्ट्र सहकारी सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये कर्ज वसुली दाखला मिळणेबाबत अर्ज केला आहे. आणि ज्या अर्थी जाबदार यांच्या पत्त्यावरती रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठवूनही अपुरा पत्ता, पत्ता सोडून गेले, परगावी या शेऱ्याने परत आलेले आहे. या अर्थी अ.क्र. १ ते २ मधील जाबदार यांना सदर दाव्यासंबंधी लेखी तोंडी म्हणणे सादर करणेसाठी अंतीम संधी म्हणून दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता खालीलप्रमाणे पत्त्यावर हजर रहावे.

सदर दिवशी हजर न राहिलेस आपणास काही सांगावयाचे नाही असे समजून तुमचे गैरहजेरीत दाव्याची सुनावणी केली जाऊन निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर समन्स दि. २३/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिला आहे.

(शिक्का)

स्थळ–सांगली
दिनांक : २३/०४/२०२५

सही/–
**उर्मिला राजमाने**
**सहाय्यक निबंधक**
सांगली जिल्हा नागरी सह.
पतसंस्था फेडरेशन लि; सांगली.

**सुनावणीचे ठिकाण :–**
**सहाय्यक निबंधक**, सांगली जिल्हा नागरी सह. पतसंस्था फेडरेशन लि; सांगली. खोली नं. २१० चे उत्तर बाजूस, २ रा मजला, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली–मिरज रोड, विजयनगर, सांगली.मिरज रोड, विजयनगर, सांगली.

## जाहीर समन्स

महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये
सहाय्यक निबंधक, सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि; सांगली

वसुली दाखला अर्ज क्र. १४८९/२४-२५ दिनांक २५/०४/२०२५

**शिवनेरी को.ऑप.क्रेडिट सोसा. लि. सांगली.** | अर्जदार

विरुद्ध

१) अविनाश अरविंद यादव
सिटी हायस्कूल रोड, गावभाग, सांगली.
२) आशिष अरविंद यादव
अनुराधा निवास, सिटी हायस्कूल रोड, गावभाग, सांगली.
३) सौ. लता ज्ञानेश्वर मोहिते
सुभाष स्मृती चैतन्यनगर, सांगली. | जाबदार

**दावा अर्ज रुपये :– ७,०३,४५३/–**

वरील जाबदार क्र. ३ यांना जाहीर समन्सने कळविणेत येते की, दावा दाखल झालेनंतर नेमलेल्या सुनावणी तारखेस उपस्थित राहून म्हणणे मांडणेकामी रजिस्टर पोष्टाव्दारे नोटीस पाठवूनही लागू झालेली नाही. सबब या जाहीर नोटीसव्दारे वरील जाबदार याना कळविण्यात येते की, सदर दाव्यासंबंधी लेखी व तोंडी म्हणणे मांडणेसाठी दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता तारीख व वेळ नेमलेली आहे. याची नोंद घ्यावी. सदर तारखेला हजर न राहील्यास तुमचे गैरहजेरीत चौकशी करुन निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

सही/–
**उर्मिला राजमाने**
**सहाय्यक निबंधक**
सांगली जिल्हा नागरी सहकारी
पतसंस्था फेडरेशन लि; सांगली.

**सुनावणीचे ठिकाण :–**
**सहाय्यक निबंधक**, सांगली जिल्हा नागरी सह. पतसंस्था फेडरेशन लि. सांगली. खोली नं. २१० चे उत्तर बाजूस, २ रा मजला, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली–मिरज रोड, विजयनगर, सांगली.

## जाहीर समन्स

महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये
सहाय्यक निबंधक, सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि; सांगली

वसुली दाखला अर्ज क्र. २६३/२४-२५ दिनांक २३/०४/२०२५

**श्री गणेश नागरी सह.पतसंस्था मर्या; तासगांव.** | अर्जदार

विरुद्ध

१) रविंद्र नानासो कुत्ते
कासार गल्ली, तासगांव
२) अनिल भूपाल बागवडे
कासार गल्ली, तासगांव
३) दिलीप दत्तात्रय कदम
गवंडी गल्ली, तासगांव | जाबदार

**दावा अर्ज रुपये :– १,०६,१०८/–**

वरील जाबदार क्र. २ यांना जाहीर समन्सने कळविणेत येते की, दावा दाखल झालेनंतर नेमलेल्या सुनावणी तारखेस उपस्थित राहून म्हणणे मांडणेकामी रजिस्टर पोष्टाव्दारे नोटीस पाठवूनही लागू झालेली नाही. सबब या जाहीर नोटीसव्दारे वरील जाबदार याना कळविण्यात येते की, सदर दाव्यासंबंधी लेखी व तोंडी म्हणणे मांडणेसाठी दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता तारीख व वेळ नेमलेली आहे. याची नोंद घ्यावी. सदर तारखेला हजर न राहील्यास तुमचे गैरहजेरीत चौकशी करुन निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

सही/–
**उर्मिला राजमाने**
**सहाय्यक निबंधक**
सांगली जिल्हा नागरी सहकारी
पतसंस्था फेडरेशन लि; सांगली.

**सुनावणीचे ठिकाण :–**
**सहाय्यक निबंधक**, सांगली जिल्हा नागरी सह. पतसंस्था फेडरेशन लि. सांगली. खोली नं. २१० चे उत्तर बाजूस, २ रा मजला, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली–मिरज रोड, विजयनगर, सांगली.

## जाहीर नोटीस

तासगांव तालुक्यातील विशेषतः गाव तासगांव येथील व आसपासच्या तालुक्यातील सर्व गांवातील तमाम लोकांना, बँकांना, पतसंस्थांना, आणि वित्तीय संस्थांना, आमचे अशिल श्री. प्रदीप जालिंदर थोरबोले रा. तासगांव, ता. तासगांव, जि. सांगली यांनी दिले माहिती, अधिकारपत्रावरून व दाखविले कागदपत्रावरून या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन :–** अ) जिल्हा तुकडी सांगली, तालुका व पोट तुकडी तासगांव पैकी मौजे तासगांव गावचे हद्दीतील शेत जमीन मिळकत **गट नं. ४००/२/१,** याचे क्षेत्र हे. ०१.५१.२२ आर, पो. ब. ००.०६.०० आर असे एकूण क्षेत्र हे. ०१.५७.२२ आर आकार रु. ९.५४ पै. यापैकी हे. ०.०६.०० आर क्षेत्र ची शेत जमीन मिळकत यासी चतुः सिमा :–पूर्वेस– नं. म. पैकी मेहत्तर यांची मिळकत, पश्चिमेस विटा–तासगाव रस्ता, दक्षिणेस वडमळा रस्ता, उत्तरेस नं. म. पैकी निर्मला सचिन पाटील व. यांची मिळकत येणे प्रमाणे शेतजमीन मिळकत तदंगभूत वस्तूसह व इजमेंटरीचे हक्कासह मिळकत.

२) वर कलम १ यात वर्णन केलेली शेतजमीन मिळकत ही बानूबी नूरजमाल मुजावर रा. तासगांव, ता. तासगांव, जि. सांगली यांनी दि. ०३/१०/१९९८ रोजी रजि. दस्त नं. ४५५३/१९९८ ने अल्लाबक्ष हाजीयाकुब म्हेत्तर यांचेकडून खरेदी घेतली होती व आहे. बानूबी नूरजमाल मुजावर या दि. २५/११/२०१६ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे पश्चात त्यांची मुले गरीबनवाझ नूरजमाल मुजावर, इस्माईल नूरजमाल मुजावर व असलम नूरजमाल मुजावर सर्व रा. मालगाव रोड, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली हे कायदेशीर वारस असून त्याप्रमाणे त्यांची सदर मिळकतीमध्ये मालकी हक्क व कब्जे वहीवाट होती व आहे. सदरच्या मिळकती निर्वेध, निजोखमी व निष्कर्जी असलेचा व सदर मिळकत आमचे आशिलांना विक्री करणेचे हक्क व अधिकार विद्यमान मालकांना आहेत असा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. वर नमूद मिळकतीचे मालक गरीबनवाझ नूरजमाल मुजावर, इस्माईल नूरजमाल मुजावर व असलम नूरजमाल मुजावर यांना त्यांचे कुटंबाचे आर्थिक गरजेपोटी तसेच देणेपाणी, मुलांचे शिक्षणासाठी व कर्जफेड करणेसाठी सदरच्या मिळकती विक्री करणेच्या असलेने त्यांनी सदर मिळकती ह्या आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देणेबाबत चर्चा करून ठरविले आहे व सदर व्यवहारापोटी भरीव इसारत रक्कम देखील स्विकारलेली आहे व आमचे अशिलांनी सदर मिळकत बाजारभावे जास्तीत जास्त रकमेस खरेदी घेणेस तयार झाले आहेत व त्याप्रमाणे दि. १५/०४/२०२५ रोजी मे. नोटरीसो, ॲड. अ. प. साठे, तासगाव यांचेसमोर अ. नं. ६३१/२०२५ कडे ठरले व्यवहाराबाबत साठेखत नोंद केले आहे. वरील मिळकतीचे मालकांनी दिलेल्या आश्वासनानुसार आमचे अशिल हे ठरल्याप्रमाणे सदर खरेदी व्यवहार सक्षम अधिकारी यांची परवानगी घेऊन व उर्वरित रक्कम देऊन लवकरच पूर्ण करणार आहेत.

३) सबब, या जाहीर नोटीसीने सर्व तमाम लोकांना कळविणेत येते की, वर कलम १ यात नमूद केलेल्या शेत जमीन मिळकतीवर कोणाचीही कसलीही तक्रार, जप्ती आदेश, मृत्युपत्र, कर्ज बोजा, पोटगी, हक्क, भाडेपट्टा, बक्षीस, दावा, कुळहक्क, अग्रहक्क, लीज, करार, मदार वारसा हक्क, अज्ञान हक्क, मुखत्यार, अगर इतर कसलाही नोंद अथवा बिननोंद हकहितसंबंध असलेस तो खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन लेखी पुराव्यानिशी १० दिवसांचे (दहा दिवसांचे) आत कळवून तशी खात्री करून द्यावी. सदर मुदतीत कोणाची काहीही हरकत अगर तक्रार न आलेस आमचे अशिल मिळकत मालक यांनी दिले खात्रीप्रमाणे व भरवशाप्रमाणे वर कलम १ यात नमूद केलेल्या मिळकती निर्वेध व निजोखमी आहेत व सदरील मिळकतीवर वरील नमूद विद्यमान मालकांव्यतिरीक्त इतर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाहीत, अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून सदर मिळकतीचे कायम खूषखरेदीपत्र करून घेतील त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. वर दिले मुदतीनंतर आलेली तक्रार आमचे अशिलावर व वर नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

म्हणून दिली जाहीर नोटीस.
दि. २६/०४/२०२५

सही/–
अशिलातर्फे ॲडव्होकेट,
**ॲड. सईश दिलीप पाटील,**
ऑफिसः– विकास सोसायटी जवळ, दत्तनगर,
येळावी, ता. तासगाव, जि. सांगली.
मो. ८६९८६९७०९४









# जमिनीचा मोबदला भुभाडे व भूसंपादन रकमेवर देय असणारे व्याज शेतकऱ्यांना मिळावे

## शिवाजीराव नाईक यांची मागणी

। ललकार वृत्त ।

शिराळा दि. २६ (वार्ताहर) – शासनाने ४४ वर्षापासून ताब्यात घेतलेल्या जमिनीचे शेतकऱ्यांना भुभाडे व भूसंपादन रकमेवर देय असणारे व्याज देखील शेतकऱ्यांना मिळालेले नाही या संदर्भात माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांनी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री नामदार राधाकृष्ण विखे- पाटील यांच्याकडे मुबई येथे प्रत्यक्ष भेटून मागणी केली.

मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी या महत्त्वाच्या प्रश्ना संदर्भात तातडीने संबंधित वारणा प्रकल्पाच्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समवेत मुंबई येथे मंत्रालय मध्ये बैठक बोलावून शेतकऱ्यांना न्याय देनार असल्याचे त्यांनी सांगितले.



शिराळा तालुक्यातील वारणा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे ५३ ते ५५ किलो १मीटर जात असलेल्या कालव्याचे काम सुरू असून संबंधित पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांच्या जमिनी सन १९७९ सालापासून त्यांच्या ताब्यात घेतल्या असल्याने शासन निर्णयानुसार जमिनीचे भाडेपट्टी शेतकऱ्यांना मिळालेले नाही. भूसंपादन रकमेवर देयअसणारे व्याज देखील शासनाकडून मिळालेले नाही ,शेतकऱ्यांच्या जमिनी मात्र गेले ४४ वर्षापासून शासनाच्या ताब्यात आहेत, हा शेतकऱ्यांच्या वर फार मोठा अन्याय आहे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या मध्ये असंतोष पसरला असून प्रकल्पाची चालू असलेल्या कामास प्रचंड विरोध होत आहे. सदरचे प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वी बाधित शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी जलसंपदांना विभाग कृष्णाखोरे विकास महामंडळाची वरिष्ठ अधिकारी व भूसंपादन अधिकारी तसेच बाधित झालेले शेतकरी यांची एकत्रित बैठक घेऊन या प्रश्नसंदर्भात शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी मंत्रालय स्तरावर बैठक बोलवण्यासाठी मागणी केली आहे.

मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी शिवाजीराव नाईक यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या पत्राचे सविस्तर माहिति घेऊन चर्चा केली लवकरच मंत्रालय स्तरावर जलसंपदा विभागाचे कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक पुणे व अधिकारी व भूसंपाद संपादन अधिकारी यांच्याबरोबर बैठक घेऊन शेतकऱ्याला न्याय देणार असल्याचे सांगितले.

# बिरदेव डोणेने पटकवली युपीएससी परीक्षेत देशात ५५१ वी रँक

। ललकार वृत्त ।

विटा दि. २६ (वार्ताहर) – इच्छाशक्तीच्या जोरावर कोणतीही गोष्ट साध्य करता येते. जर तुमच्या मनात दृढ इच्छा असेल, तर तुम्ही यश मिळवू शकता. पण त्यासाठी दृढ संकल्प आणि ध्येयपूर्तीसाठी कठोरपणे काम करण्याची तयारी लागते. याचचं एक उदाहरण म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील यमगे येथील बिरदेव सिध्दाप्पा डोणे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या निकालात बिरदेव याने देशात ५५१ वी रँक मिळवली आहे.

वडील मेंढपाळ, घरात कोणतीही सुविधा नाही, शिक्षणाचं वातावरण



तर दूरची गोष्ट. पण त्याच्या डोळ्यात एक वेगळी चमक. पहिल्यापासूनच अधिकारी होणाचे स्वप्न होते अन अखेर बिरदेव सिध्दाप्पा डोणे या मेंढपाळाच्या मुलाने ते पुर्ण केले. बिरदेव यांनी मिळवलेलं हे यश समाजापुढे प्रेरणादायी ठरणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या निकालात बिरदेव याने देशात ५५१ वी रँक मिळवली आहे. निकाल समोर आला त्यावेळी बिरदेव आपल्या आई वडील यांच्यासह बेळगाव परिसरामध्ये बकरी चारण्यासाठी गेला होता.

बिरदेव सिध्दाप्पा डोणे याचं बालपण डोंगरदऱ्यांमध्ये मेंढ्या चारत, कधी उघड्यावर अभ्यास करत करण्यात गेलं. मेंढ्या पाळण्यात आणि त्यांचा सांभाळ करण्यात देखील मोठी आव्हानं आहेत आणि त्यापेक्षा मोठं काहीकरी केलं पाहिजे यासाठी त्याने मेहनत घेतली, स्वतःच्या आयुष्याला दिशा द्यायची आणि गावकऱ्यांचा अभिमान वाटावा असं काहीतरी घडवायचं आणि आपल्या माणसांच्या समाधानासाठी काहीतरी करायचं असं त्याने ठरवलं होतं. गावातील शाळेत प्राथमिक, माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. दोन खोलीचं घर अभ्यास करायला जागा नसल्याने गावातील मराठी शाळेचा व्हरांड्यात तो अभ्यास करायचा.

सुरवातीपासून स्पर्धा परीक्षेचे वेड असल्याने त्याने सुरवातीस दोन वर्षे दिल्लीमध्ये जाऊन केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करत होता. त्यानंतर तो पुन्हा पुण्यात आला. तिथे सदाशिव पेठेमध्ये अभ्यास करू लागला. त्याने आता पर्यंत दोनवेळा ही परीक्षा दिली होती. पण त्याला यशाने हुलकावणी दिली होती. पण जिद्दीने त्याने मागील वर्षी पुन्हा परीक्षा दिली आणि यामध्ये उज्वल यश मिळवत त्याने देशात ५५१ वी रँक मिळवली.

कुटुंबाचे अर्थकारणच या भटक्या जीवनशैलीवर अवलंबून असल्याने तोही मेंढ्यांच्या मागे दिवसभर वणवण भटकत होता. मात्र, मंगळवारी दुपारी केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल जाहीर झाला अन् या वणवण भटकणाऱ्या पोराला शोधण्यासाठी यमगे, कागलसह कोल्हापूर जिल्ह्यातील मान्यवरांची अक्षरशः धांदल उडाली. मेंढ्यामागे दमून भागून थकलेल्या या पोराने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात ५५१ वी रँक पटकावत आपल्या चंद्रमौळी झोपडीवर यशाचा झेंडा फडकवला.

## मयूर कॉलनीतील डांबरीकरणास प्रारंभ

। ललकार वृत्त ।



सांगली दि. २६ (प्रतिनिधी) – सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका प्रभाग क्रं.१० मधील मयूर कॉलनी (रिसालदार मळा) येथील रस्त्याच्या डांबरीकरणास आज रोजी प्रारंभ करण्यात आला.माजी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांच्या निधीतून सदरचे काम मंजूर करण्यात आले होते. सदर भागातील रस्ता मंजूर व्हावा यासाठी येथील राहिवाशी नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून माजी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांच्याकडे मागणी करीत होते, त्यांच्या मागणीची दखल घेत आजरोजी याकामास येथील नागरिकांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.हे काम होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी शाखा अभियंता महेश मदने,स्थानिक नागरीक विलास पाटील,महेंद्र यरगट्टीकर,संजीव चाफेकर, महेश मुंदडा,चंद्रकांत भगाटे,गणपती चवडीकर, सचिन ऐवळे,अनिल वडर यांचेसह स्थानिक नागरीक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# भरकटलेल्या मतिमंद तरुणीला केले नातेवाईकांच्या स्वाधीन

## आटपाडी पोलिसांची कर्तव्यदक्षता

। ललकार वृत्त ।

मिरज दि. २६ (वार्ताहर) – पोलीस हे सुद्धा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. त्यांनाही भावना आहेत. माणूस म्हणून कर्तव्यदक्ष आहे. आटपाडी पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेपणा मुळे एक तरुण मुलगी एकटीच डाळिंबाच्या बागे जवळ सायंकाळी आढळून आली. दक्ष नागरिकांनी ११२ नंबर वर कॉल करून माहिती दिली. तातडीने पोलीस वाहन घेऊन पोलीस नाईक अर्जुन बोडखे व महिला पोलीस कॉन्स्टेबल मोहिते घटनास्थळी दाखल झाले. सदर तरुणी नाव, पत्ता



नातेवाईकांची माहिती मानसिक स्थितीमुळे देऊ शकत नव्हती. पोलिसांनी मिरज येथील आस्था बेघर महिला निवारा केंद्राशी संपर्क साधला. शासकीय रुग्णालय व पोलिसांनी सर्व प्रक्रिया पार पाडून रात्री अडीच वाजता सदर तरुणीस सुरक्षेच्या कारणास्तव केंद्रात दाखल केले. तरुणीची अवस्था लक्षात घेऊन केंद्रातील काळजीवाहक मुलींनी दक्षता घेऊन जेवण दिले. ती स्वतःहून खाऊ शकत नसल्यामुळे त्यांनी हाताने खाऊ घातले. तिची पूर्ण काळजी घेतली. सायंकाळी साडेसात ते मध्य रात्री अडीच वाजेपर्यंत आटपाडी पोलीस व निवारा केंद्रातील संस्थाप्रमुख सुरेखा शेख यांनी वेळोवेळी समन्वय साधून, सुरक्षेच्या कारणाने महिला केंद्रात दाखल केले. केंद्र व पोलिसांच्या पाठपुरामुळे सदर तरुणीच्या नातेवाईकांचा शोध लागला. व नातेवाईकांच्या ताब्यात दिल्यानंतर नातेवाईकांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसून आला.. जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखालील आटपाडी पोलीस स्टेशनने दाखवलेल्या दक्षतेमुळे व सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना व राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियान अंतर्गत आयुक्त सत्यम गांधी, उपायुक्त स्मृती पाटील, प्रकल्प व्यवस्थापक ज्योती सर्वदे, संस्थाप्रमुख सुरेखा शेख यांच्या मार्गदर्शनाखाली चालवण्यात येणाऱ्या आस्था बेघर महिला निवारा केंद्राचे आभार मानून, कौतुक केले.

## सर्जेराव रावते यांना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार

। ललकार वृत्त ।

शिराळा दि. २६ (वार्ताहर) – राज्य शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून दिले जाणारे विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार महाराष्ट्र राज्य विघुत वितरण कंपनी इस्लामपूर कासेगाव सब स्टेशन टाकवे येथील विवेक सर्जेराव रावते यांना पुरस्कार जाहीर झाला. .

सांगली जिल्हा मध्ये एकमेव पुरस्कार यांना जाहीर करण्यात आला आहे.गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारासाठी रु.२५ हजार, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र प्रदान करण्यात येणार. कामगाराची निवड केली जाते विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी राज्यभरातून ५१ कामगारांची निवड करण्यात आली आहे. नोकरी करत असतानाच विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संघटन आदी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. दरवर्षी एका कामगाराची कामगार भूषण पुरस्कारासाठी तर ५१ कामगारांची विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी सर्व पुरस्कार्थींचे अभिनंदन केले आहे. हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे येत्या १३ मे रोजी या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# तरुण भारत व्यायाम मंडळ व कनिजुकू चॅम्पियन्स कराटे अकॅडमी मार्फत उन्हाळी शिबीर २०२५ सुरुवात




। ललकार वृत्त ।

सांगली दि. २६ (प्रतिनिधी) – कबड्डीसाठी देशभर ख्याती मिळवलेले तरुण भारत व्यायाम मंडळ, सांगली आणि कनिजुकू चॅम्पियन्स कराटे अकॅडमी मार्फत उन्हाळी शिबीर २०२५ ची सुरुवात दिनांक २६ एप्रिल पासून ते ०४ मे, २०२५ पर्यंत सकाळी ०७.०० ते दुपारी १२.०० पर्यंत तरुण भारत स्टेडियम, सांगली येथे आयोजित केलेले आहे.

सदर उन्हाळी शिबीरामध्ये नेट क्लाइंबिंग, रोप क्लाइंबिंग, मर्दानी खेळ, योगा, मनोरंजक खेळ, नान-चाकू प्रशिक्षण, कराटे, लाटीकाठी, आत्मसंरक्षण, पोहणे, जिम्नॅस्टिक, डान्स, कबड्डी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कवायत, लेझीम इत्यादी खेळाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच शिबीर कालावधीत पन्हाळागड येथे ट्रिपचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबीरामध्ये वय ०३ ते १६ वर्ष (मुले व मुली) मध्ये एकूण सहभागी संख्या ही ७० आहे.

तरुण भारत व्यायाम मंडळ व कनिजुकू चॅम्पियन्स कराटे अकॅडमी चे महेश भोकरे सर व त्यांची टिम सहभागी खेळाडूंना विविध खेळ प्रकारामध्ये प्रशिक्षण देत आहेत. सहभागी मुले व मुलांना टी-शर्ट, कॅम्, प्रमाणपत्र व दररोज नाश्ता, फळे देण्यात येत आहे.

या उन्हाळी शिबीराचा ओपनींग कार्यक्रम दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. तरुण भारत व्यायाम मंडळ, सांगली येथे पार पडला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष – महेश पाटील, उपाध्यक्ष – पारिसा नागे, कार्यवाह – प्रताप जाधव, अभय खाडिलकर, राजेंद्र भोसले, खजिनदार – सतिश भोसले, संचालक – धनराज पाटील, प्रमोद सूर्यवंशी, विजय साळुंखे, राजाराम भोसले, अशोक चव्हाण, संजय सूर्यवंशी, सुनिल धुमाळे व कनिजुकू चॅम्पियन्स कराटे अकॅडमी चे महेश भोकरे व त्यांची टिम इत्यादी सहभागी होते.

सदर उन्हाळी शिबीरामुळे सहभागी मुले व मुली यांना खेळाची आवड निर्माण होऊन ते मोबाईल व कॉम्प्युटर यापासून काहीवेळ लांब राहतील व त्यामुळे त्यांच्या शारिरीक व मानसीक विकास होण्यास मदत होईल.



## वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाची गुणवंत खेळाडू मनिषा मोहिते हिची महसुल सहाय्यकपदी निवड

। ललकार वृत्त ।

तासगाव दि. २६ (वार्ताहर) – गुणवत्तेची शिखरे पादाक्रांत करणाऱ्या पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.मनिषा अशोक मोहिते हिची महसुल सहाय्यक पदी निवड झाली.ज्युनिअर वाणिज्य विभाग, बीसीए विभागात शिक्षण घेत असतानाच बॉक्सिंग स्पर्धेत राज्यस्तरावर सिल्वर मेडल मिळवणारी शांत, सुसंस्कृत विद्यार्थिनी कु.मनिषा मोहिते हिने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून एमपीएससीच्या खेळाडू कोट्यातून महसूल सहाय्यक पद प्राप्त केले.त्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अर्थ सहसचिव आणि पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे साहेबांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी मनिषाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच खेळातूनही आपले करिअर करण्याचा प्रयत्न करावा.विद्यार्थ्यांनी आपली ओळख बनवावी असे सांगून तिला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.


### पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरती (टप्पा क्र. २)
### दि मिरज एज्युकेशन सोसायटी, मिरज (273510SC064)

या व्यवस्थापनाच्या मराठी माध्यमाच्या १००% अनुदानित शाळेसाठी खाली नमूद केलेल्या पदांकरीता पवित्र पोर्टल प्रणालीतील नोंदणीकृत पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळावरील जाहिरात पहावी.

https://tait2022mahateacherrecruitment.org.in

| विभाग | पद | एकूण पदे | वेतनश्रेणी | विषय | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक- नूतन बाल विद्यालय मिरज | शिक्षणसेवक इ. १ली ते ४ थी | २ | १६००० | सर्व विषय | वि.जा.अ.-१, एसईबीसी-१ |
| माध्यमिक- ज्युबिली कन्या शाळा मिरज | शिक्षणसेवक इ. ५ वी | २ | १६००० | सर्व विषय | अ.जा.-१, भ.ज.ड.-१, इ.मा.व.-१ वि.मा.प्र.-१, एसईबीसी-१, खुला-२, (पैकी १ महिला) वरीलपैकी १ जागेसाठी अस्थिव्यंग प्राधान्य |
| | शिक्षणसेवक इ. ६ वी ते ८ वी | ४ | १६००० | मराठी, हिंदी भूगोल, गणित | |
| | शिक्षणसेवक इ. ९ वी ते १० वी | १ | १८००० | शारिरीक शिक्षण | |

**कार्यवाह**
**दि मिरज एज्युकेशन सोसायटी, मिरज**
व्दारा : ज्युबिली कन्या शाळा, मैदान दत्त मंदिराजवळ,
लोणी बाजार, मिरज, ता. मिरज, जि. सांगली.
मो. 9372040818



### महात्मा फुले शिक्षण संस्था,उरुण-इस्लामपूर,ता.वाळवा,जि.सांगली.

**पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-2) संस्था कोड व संस्थेचे नाव: (273509SC017) Mahatma Phule Shikshan Sanstha, Urun-Islampur, Tal.Walwa, Dist. Sangli, (Secondary and Higher Secondary) — With Interview**

**महात्मा फुले शिक्षण संस्था,उरुण-इस्लामपूर,ता.वाळवा,जि.सांगली** या व्यवस्थापनाच्या अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये शासनाने विहित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने शासन मान्येतेच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**मान्य दिनांक : 31/03/2025** **प्रसिध्दी दिनांक : 25/04/2025**

**विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी / मानधन | विषय | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Graduate Teacher std. (6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Language (English) | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher std. (6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Social Science | 1 |
| 3 | Marathi | Graduate Teacher std. (6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Science | 2 |
| 4 | Marathi | Graduate Teacher std. (9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Language (English) | 2 |
| 5 | Marathi | Graduate Teacher std. (9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Mathematics | 1 |
| 6 | Marathi | Higher Secondary Teacher | Consolidated Pay - High Sec (20000) | Chemistry | 2 |
| 7 | Marathi | Higher Secondary Teacher | Consolidated Pay - High Sec (20000) | Biology | 1 |
| | | | | Total | 10 |

**आरक्षण निहाय रिक्त पद तपशील : अनु.जा.-01,इमाव-01,ई.डब्लू.एस.-01, एसईबीसी -01,खुला -03 तसेच,समांतर आरक्षण निहाय रिक्त पद तपशील : महिला -02, माजी सैनिक -01, (दिव्यांग — अस्थिव्यंग — 01)**

**सर्वसाधारण सूचना :**

1. अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी -2022(TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे. असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील व पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम सर्व उमेदवारांसाठी बंधनकारक राहतील. इच्छूक व अर्हता धारण करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदांसाठी पसंतीक्रम नमूद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत.
2. इ.1 ली ते इ. 5 वी व इ.6 वी ते इ.8 वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुध्दिमत्ता -2022(TAIT) परीक्षेपूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा(TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील. डिसेंबर 2022 मध्ये CTET करीता प्रविष्ट उमेदवारांचा निकाल मात्र TAIT परीक्षेनंतर लागलेला असला तरी असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील. इ.1 ले ते 8वी / इ.9 वी ते 12 वी या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी -2022 (TAIT) या चाचणीस प्रविष्ठ असणे आवश्यक आहे.
3. शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा,आरक्षण,अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादी साठी सर्वसाधारण सूचना सविस्तर तपशिलासह (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये "उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना" या शीर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वत:ची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
4. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम,दि.26/02/2024 अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल याचिका क्र.3468/2024 तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.
5. सदर जाहिरातीमधील सविस्तर सूचना,तपशिल व विहित प्रक्रिया संस्थेच्या www.kbpislmapur.com व पवित्र प्रणाली https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**सही /-**
**जनरल सेक्रेटरी,**
**महात्मा फुले शिक्षण संस्था,**
**उरुण-इस्लामपूर,ता.वाळवा,जि.सांगली.**

सुवर्ण महोत्सवी दैनिक

ललकार

।। माय मराठी, नांव मराठी, मराठ मोळा प्राण महाराष्ट्र भूमित जन्मलो हा माझा अभिमान ।।

# दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही . या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्त्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्र आहेत. या शत्रविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

# गुरु वचन

## नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो. ''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!'' दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

# ।। अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज ।।

श्री गजानन महाराज शेगाव श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर गोंदवले श्री साईबाबा शिर्डी त्याचप्रमाणे स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट हे सर्व ठिकाणे संतांच्या चरणस्पर्शाने पावन झालेले भूमी आहे.


श्री स्वामी समर्थ ज्यांना आपण अक्कलकोट स्वामी म्हणतो महाराष्ट्रातील अक्कलकोट येथे खूप काळ म्हणजे जवळपास १४ वर्ष त्यांचे वास्तव्य वटवृक्षा खाली होते. श्रीपादवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्या नंतरचे भगवान श्रीदत्तात्रेयांचे ते तिसरे पूर्णा अवतार आहेत, अशी मान्यता आहे. गाणगापूरचे श्री नृसिंह सरस्वती हेच नंतर श्रीस्वामी समर्थांच्या रूपाने प्रकट झाले. मी नृसिंह भान असून श्रीशैलम्‌जवळील कर्दळी वनातून आलो आहे हे स्वामींच्या तोंडचे उद्‌गार ते नृसिंह सरस्वतींचा अवतार असल्याचे सुचवतात. विविध ठिकाणी स्वामी विविध नावांनी वावरले.

स्वामी समर्थांचा अवतार हा पंजाब प्रांतात हस्तीनापूर पासून जवळपास २५ ते ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या छेली खेडी नावाच्या गावात वटवृक्षाच्या जवळ गणेश मूर्तीच्या

शेजारी झाला . तिथे धरणी दुभंगून एक आठ वर्षाची अतिशय तेजस्वी बालमुर्ती प्रकटली. आणि तेच प्रत्यक्ष परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराज अशी ही आख्यायिका आहे.

श्रीदत्तात्रयांचे तिसरे अवतार म्हणून अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ मानले जातात. आपल्या अवतार समाप्तीच्या वेळी श्रीनृसिंहसरस्वती श्रीशैल्य येथून कर्दळीवनामध्ये गेले. तेथे ते तपश्चर्येला बसले. मध्ये साडे तीनशे वर्षे गेली. त्यांच्याभोवती वारूळ तयार झाले. एके दिवशी एक लाकूडतोडय़ा लाकूड तोडताना त्याचा घाव चुकला आणि तो वारुळावर पडला. त्या वारुळातून श्रीस्वामी समर्थ प्रकट झाले, असे सांगितले जाते. लाकडे तोडताना कुऱ्हाडीचा घाव वारुळावर बसला व तो श्रीस्वामी समर्थांचे मांडीवर लागून श्रीस्वामी समर्थ समाधीतून जागे झाले. तो कुऱ्हाडीचा वार त्यांचे मांडीवर स्पष्ट दिसत असे. श्रीस्वामी समर्थ तेथून श्रीकाशीक्षेत्री प्रकट झाले. तेथून गंगाकाठाने कलकत्ता, जगन्नाथपुरी मार्गाने गोदावरी तीरावर आले. प्रथम श्रीस्वामी समर्थ मंगळवेढे ग्रामी प्रकट झाले. ते रानात वास्तव्य करीत. क्वचित गावात येत. गावात एक ब्राह्मण कुटुंब होते. ते श्रीस्वामी महाराज गावात आले की भोजन देत. मंगळवेढे येथील वास्तव्यानंतर श्रीस्वामी समर्थ पंढरपूर, मोहोळ, सोलापूर ह्या ठिकाणी वास्तव्य करून 'श्री' अक्कलकोट येथे आले . चैत्र शुद्ध द्वितीया शके १७७८ रोजी ते अक्कलकोट येथे प्रकट झाले. दिवस होता रविवार ६ – ४ – १८५६. त्या वेळी तीन दिवस स्वामींनी अन्नग्रहण केले नव्हते. चोळाप्पा यांनी स्वामींना आपल्या घरी नेले व त्यांना भोजन दिले. त्या वेळेपासून श्री चोळाप्पा स्वामींचे एकनिष्ठ शिष्य झाले. चोळाप्पांचे घरातील मंडळी त्यांना 'एक वेडा घरात आणून ठेवला आहे' असे म्हणत. श्री स्वामींच्या दिव्यत्वाची प्रचिती अक्कलकोट येथील मंडळीस येऊ लागली व लोक स्वामीदर्शनास येऊ लागले. महाराजांनी त्याचे आपल्या भक्तांना अनेक लीला दाखवल्या चमत्कार केले, तसेच उपदेशही केला.

श्री स्वामींची शिकवण म्हणजे त्यांनी वेळोवेळी प्रत्यक्षात कथन केलेल्या सांकेतिक शब्दातून व्यक्त केले आहेत. आत्मसाक्षात्कार करून घेण्यास साधकाला एखाद्या सद्गुरूस शरण



जाण्याची गरज आहे. अशा सद्गुरूंची भेट झाल्यावर साधकाने सद्गुरूंच्या स्वरूपाचे निरंतर चिंतन करावे. त्यांची आराधना करावी. त्यांच्या मुखातून निघणारे प्रत्येक अक्षर, हे मंत्रस्वरूप मानून अंत:करणाने ग्रहण करावे. अशी गुरुसेवा केल्याने साक्षात्कार होऊन अंती मोक्षप्राप्ती होते. वाटेल त्याच्या हातचे अन्न ग्रहण करू नये. निरंतर केवळ विषय चिंतन करणाऱ्या स्त्री अगर पुरुषाच्या हातचा विडाही खाल तर तुम्हीही तसेच व्हाल. दुष्ट मनुष्याच्या हातचे अन्न खाल तर, तुम्हीही दुष्ट व्हाल. एक ईश्वरच सर्वत्र भरलेला आहे अशी भावना करा, जेणेकरून तुमचे मन निरंतर पवित्र राहील. परावलंबी नसावे, स्वत: उद्योग करावा व खावे. गांजा केव्हाही ओढू नये, त्याने अपाय होतो. आपल्या धर्माप्रमाणे वागावे व कर्तव्य करावे त्यानेच सर्वत्र विजय प्राप्त होतो. ज्याप्रमाणे बी पेरल्याशिवाय शेत आपण होऊन पीक देत नाही, त्याचप्रमाणे तुम्ही स्वत: कोणतीही ज्ञानपिपासा दाखविल्याशिवाय गुरू आपण होऊन ज्ञानोपदेश देणार नाहीत. साधना करताना ज्या काही सिध्दी प्राप्त होतात, त्यांचा चमत्कार दाखविण्याच्या कामी उपयोग करणे गैर आहे. परमार्थज्ञानाचा उपयोग स्वचरितार्थाचे साधन म्हणून करणे हे अयोग्य आहे.

ईश्वरीय ज्ञानाचा उपदेश करणाऱ्या सर्व धर्म मतांचे व सर्व पंथांचे अंतिम ध्येय एकच असल्यामुळे सर्व धर्म मते व पंथ वंदनीय आहेत. या जगात प्राप्त होणारी सुख-दु:खे, परमात्माच्या इच्छेने घडतात असे मानून त्यांचा स्वीकार करावा. मूर्तिपूजा ही त्याविषयी रहस्य जाणून करावी, केवळ मूर्तिपूजाच करीत राहणे, हेच मनुष्यप्राण्याचे कर्तव्य नाही. परमात्माप्राप्ती हे खरे ध्येय असल्याने उत्तरोत्तर आत्मोन्नती करून घेण्यासाठी प्रयत्नशील असावे.नामाच्या पाठीमागे मी आहे.

आज अक्कलकोट हे भाविकांचे फार मोठे श्रद्धास्थान आहे लाखो भक्त या ठिकाणी दर्शनाचा लाभ घेत असतात तेथे असलेल्या अन्नछत्रात प्रसादाचाही लाभ घेतात अक्कलकोट येथे.

श्री गुरु मंदिर म्हणजेच बाळाप्पा महाराजांचा मठ. धारवाड जिल्ह्यातील श्रीमंत सराफ बाळप्पा. आपल्या संसाराचा त्याग करून तिसावे वर्षी अक्कलकोटला गुरु शोधार्थ आले. स्वामींनी त्यांना अनुग्रह देऊन आपल्या आत्मलिंग पादुका दिल्या आणि मठ बांधण्याची आज्ञा केली. माझ्या आत्मलिंग पादुका घेऊन त्यावर एखादा उत्तम मठ स्थापन कर आणि वार्षिक उत्सव करत जा असे त्यांना सांगितले त्यानुसार बाळाप्पांनी मठ स्थापन केला तोच बाळप्पा चा मठ म्हणून ओळखला जातो.

अक्कलकोट येथे वटवृक्ष संस्थान मठ आहे . त्याच परिसरात स्वामी समर्थांचे मंदिरे आहे भक्तांचा या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर ओढा आहे या वटवृक्ष खाली स्वामिनी जवळपास १४ वर्षे वर्ष रहिवास होता आजही तेथे येणाऱ्या भाविकास पूजा नैवेद्य अभिषेक तसेच राहण्याची भोजनाची व्यवस्था केली जाते तसेच संस्थानमार्फत प्रवासासाठी खुले आहे या मठात श्रीच्या जागृत पादुका असून गुरुपौर्णिमा दत्त जयंती स्वामी पुण्यतिथी आदी उत्सव संपन्न होतात.

स्वामींनी यांच्या घरी बरीच वर्षे वास्तव्य केले त्या भक्त चोळपाच्या इच्छेनुसार श्रींची समाधी या मठात आहे चोळप्पाच्या घराजवळ समाधी मंदिर असून त्यात स्वामींनी दिलेल्या पादुका आहेत.

जोशीबाचा मठ, शंकरराव राजेरायन यांचा मठ, महाराजांच्या चर्मपादूका, हाक्याचा मारुती, जंगम यांचे शिव मंदिर, मुरलीधर मंदिर, दर्गा, मालवणी मालोजीरांचा किल्ला, शिवपुरी, आदी ठिकाणे भेट देण्यासारखे आहेत.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी अग्निहोत्र कसे करावे? अग्निहोत्र म्हणजे काय इत्यादी महत्त्वाची माहिती शिवपुरी येथे सांगतात त्यासाठी सूर्यास्ताच्या आधी साधारणपणे एक तास पोहोचावे लागते तसेच श्री महारुद्र रावांची समाधी चोळप्पा महाराज वाड्यातील श्री महाराजांच्या समाधी मठासमोर आहे. याच महारुद्रवांना वचन दिल्याप्रमाणे केज येथे त्यांच्या घरी जाऊन सगुण दर्शन दिले आणि म्हणूनच हम गया नही जिंदा है या वचनाची साक्ष पटते .आजही त्यांच्या मार्फत मठात सेवा सुरू आहे.

आज महाराष्ट्रात बहुतेक जिल्हा तालुक्याच्या ठिकाणी तसेच अगदी ग्रामीण भागातही स्वामी समर्थांची मंदिरे तसेच पुणे,नासिक, जळगाव ,मुंबई आदी ठिकाणी स्वामी समर्थांचे मठ आहेत आणि त्या ठिकाणी दररोज उपासना सुरू असते. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ हा जप सुरू असतो.स्वामी समर्थांच्या पोथीचे वाचन, पारायण सुरु असते.

आता अक्कलकोट ला मंदिराच्या व्यवस्थेत खूप सुधारणा झालेली आहे.बदल झाला आहे. भाविकांचा ओघही वाढलेला आहे.

शनिवार दिनांक २६ एप्रिल २०२५ हा स्वामी समर्थांचा समाधी दिन आहे स्वामी समर्थांच्या चरणी कोटी प्रणाम.

**।। श्री स्वामी समर्थ।।**

# पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या २७९५ पदांची भरती २९ एप्रिलपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची माहिती

मुंबई, दि. २६ (वृत्तसंस्था) – राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागात 'पशुधन विकास अधिकारी' या संवर्गाची २७९५ पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी उमेदवारांना २९ एप्रिल २०२५ पासून १९ मे २०२५ पर्यत आपला अर्ज सादर करता येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे देण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागणीवरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ या संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत पशुसंवर्धन विभागात 'पशुधन विकास अधिकारी' या संवर्गाची २७९५ पदे भरली जाणार आहेत. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा तपशील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी अर्ज करताना आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

# हिंसक संस्कृतीला आमचा निषेध : विद्यार्थ्यांचा आक्रोश

विजयपूर दि. २६ (वार्ताहर) – देश की रक्षा कौन करेगा? हम करेंगे! हम करेंगे! जम्मू आणि काश्मीर – भारत मातेचे सिंदूर! या देशाच्या रक्षणाची जबाबदारी कोणाची? आमचीच! काश्मीरमध्ये झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्याचा आम्ही निषेध करतो! धर्माधारित क्रूर कृत्यांचा अंत व्हावा! शांती आमचा मंत्र, प्रेम आमचं शस्त्र!

अशा घोषणांनी आपला रोष व्यक्त करत ५१५ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी आवाज उठवला.

शांतिकुटीर, कन्नूरमध्ये चालू असलेल्या एक महिन्याच्या ग्रामीण भागातील शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत उन्हाळी शिबिरामध्ये ५वी ते १०वीच्या मुलामुलींनी पहलगाव येथे झालेल्या अतिरेक्यांच्या



हल्ल्याचा निषेध करत आपली शांततामय निदर्शने करुन व्यक्त केली. भारत माझा देश आहे, सर्व भारतीय माझे बांधव आहेत हे विधान फक्त पाठ्यपुस्तकांपुरते न ठेवता जीवनात आत्मसात करण्याचा प्रयत्न या मुलांनी केला. काश्मीरमधील ह्या क्रूर आणि हीन कृत्याचा निषेध करण्यासाठी त्यांनी हातात मेणबत्त्या प्रज्वलित करून आपल्या मनातील संताप व्यक्त केला.

श्री समर्थ सद्गुरु गणपतराव महाराजांनी भारतीय सुराज्य संस्थेची स्थापना करून जाती, धर्म, पंथ, प्रांत, भाषा अशा संकुचित विचारांना आवर घालण्यासाठी आणि राष्ट्रीय एकतेला चालना देण्यासाठी प्रयत्न केले. या सद्गुरूंच्या तळमळीचे प्रतिनिधित्व मुलांनी केले.

व्यक्तींमध्ये सलोखा, बंधुता, प्रेम आणि शिक्षणाचे मूल्य प्रस्थापित करून आदर्श भारत घडवण्याच्या उद्दिष्टाने भारतीय सुराज्य संस्था कार्यरत आहे. लहानपणापासूनच ही मूल्ये अंगीकारण्याचा प्रयत्न केला जात आहे. या प्रसंगी भारतीय सुराज्य संस्थेचे अध्यक्ष, श्री श्रीशैलेश्वर विद्याकेन्द्राचे शिक्षक, रामराज्य कलामेळाचे कार्यकर्ते आणि कन्नूर व आजूबाजूच्या भागातील सुमारे ५१५ मुले या निदर्शनात सहभागी झाली होती. या विद्यार्थ्यांनी दहशतवाद निर्मूलनात माझी भूमिका या विषयावर निबंध लिहिण्याची स्वप्रेरणेने तयारी दर्शवली. सभा एका मिनिटाच्या मौन पाळून संपविण्यात आले.


# 'वेव्हज २०२५' : माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या जागतिक परिवर्तनाचा प्रारंभ

देशातील माध्यम व मनोरंजन (चशवळर एपींशींीरळपाशपीं) क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या 'थ-तएड २०२५' या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. १ मे रोजी, प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री श्री. अश्विनी वैष्णव व मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

१ ते ४ मे दरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर 'क्रिएटर हब' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न 'थ-तएड २०२५' च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील १०० पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

"WAVES २०२५' ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन




(चए) उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

'WAVES बाजार' एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नव्या प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना, आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होतील. विशेषतः, श्रेणीआधारित शोध प्रणाली आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधांमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील.

परिषदेत काय असणार?

१. परिषद सत्रे जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील.

२. मीडिया मार्केटप्लेस भारताच्या माध्यम व मनोरंजन (चए) क्षेत्रातील वैविध्य, क्षमता आणि नवकल्पनांचे आकर्षक प्रदर्शन.

३. तंत्रज्ञान प्रदर्शन नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो.

४. सांस्कृतिक कार्यक्रम भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम.

माध्यम आणि मनोरंजन उद्योग सध्या मोठ्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर आहे. 'थ-तएड २०२५' ही परिषद नव्या कल्पनांना दिशा देऊन, भारताला जागतिक चए सुपरपॉवर बनवण्याचा पाया रचणार आहे. सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागीदारी यांचा मेळ घालून, भारताला 'ग्लोबल कंटेंट डेस्टिनेशन' बनवण्याचे स्वप्न या मंचाद्वारे प्रत्यक्षात उतरणार आहे. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणारी ही परिषद भारताच्या सृजनशील भविष्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारी ठरणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे,**
उपसंचालक (वृत्त)

# शेतकरी संवाद व आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

कोल्हापूर दि. २६ (वार्ताहर) – राष्ट्रीय विकासात योगदान देण्यासाठी जलसंपदा विभागाने पाण्याचा कार्यक्षम वापर करुन कृषी उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावा. तसेच शाश्वत जलस्त्रोत निर्माण करण्यासोबतच जल व्यवस्थापनावरही भर द्यावा, असे आवाहन जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे यांनी केले.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाअंतर्गत कोल्हापूर पाटबंधारे मंडळाच्या वतीने जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ अंतर्गत शेतकरी संवाद व आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत असलेली ही कार्यशाळा जलसंपदा, कृषी विभाग व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन सभागृहात घेण्यात आली. यावेळी जलसंपदा विभागाचे उप अधीक्षक अभियंता संजय पाटील कार्यकारी अभियंता स्मिता माने, रोहित बांदिवडेकर, अशोक पवार, देवाप्पा शिंदे, कारभारवाडीचे नेताजी पाटील, कृषी उपसंचालक नामदेव परीट, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रसाद संकपाळ आदी उपस्थित होते. कार्यक्रमात शेतकऱ्यांना पाणी परवाने व प्रगतशील शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. कार्यशाळेच्या सुरुवातीला जल प्रतिज्ञा घेण्यात आली.

श्री. म्हेत्रे म्हणाले, कोल्हापूर हा पाण्याने समृद्ध असणारा जिल्हा आहे. या जिल्ह्यात लघु, मध्यम, मोठ्या सिंचन प्रकल्पांबरोबरच कोल्हापूर पद्धतीचे बंधारेही बांधण्यात आले असून यात सुमारे ९४ टीएमसी पाणीसाठा आहे. जिल्ह्यातील एकूण लाभक्षेत्रापैकी बहुतांशी क्षेत्र ओलिताखाली आले असले तरी शंभर टक्के क्षेत्र अद्याप ओलिताखाली आलेले नाही. त्यामुळे धरणांमध्ये दहा ते पंधरा टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहतो. परंतु भविष्यात पूर्ण क्षमतेने सिंचन क्षमता निर्मिती झाल्यानंतर सध्या



उपलब्ध असणारे पाणी कमी पडण्याची शक्यता निर्माण होवू शकते. यामुळे पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच परंपरागत शेती पद्धतीमध्ये बदल करून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याबरोबरच पाण्याचा योग्य वापर करणेही आवश्यक आहे. जिल्ह्यात येणाऱ्या पुराच्या पाण्यापैकी धरणातून सोडण्यात येणारे पाणी केवळ पंधरा टक्के असून धरणाच्या खालील बाजूच्या क्षेत्रामधून येणारे म्हणजेच फ्री कॅचमेंट मधून येणारे पाणी ८५ टक्के आहे. त्यामुळे नदीमध्ये येणाऱ्या या एकत्रित पाण्याचे योग्य नियोजन होणेही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

नेताजी पाटील म्हणाले, ठिबक सिंचनावर आधारित शेती ही काळाची गरज आहे. कारभारवाडीमध्ये ठिबक सिंचनावरील शेतीबरोबरच सेंद्रिय शेती, कारभारी गुळाचा गोडवा ब्रँड, पापड, लोणची, मसाले, शेवया बनवणे, आदी उद्योगातून कारभारवाडी प्रगती साधत आहे. गावात सध्या सुमारे १५० रोजगार निर्माण झाले आहेत. महिला गृह उद्योग, कृषी पर्यटन आदी अनेक उद्योगातून गावातील प्रत्येक कुटुंबातील एक महिला अथवा एक व्यक्ती सक्षम होईल यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्याचबरोबर इथला शेतकरी शेतमाल पिकवण्याबरोबरच उद्योग समूहा मार्फत तो शेतमाल विकण्यासाठीही सज्ज झाला आहे. यामुळे कारभारवाडीची वाटचाल पाणी व्यवस्थापनाकडून स्वयंपूर्ण खेड्याकडे होत आहे.

नामदेव परीट म्हणाले, पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करणे गरजेचे आहे. पाण्याचा अवास्तव वापर थांबवणे, पाण्याचा कार्यक्षमपणे योग्य वापर करुन शेतीची उत्पादकता वाढवणे व जमिनीचे रक्षण करणे आवश्यक आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर करुन शेती उत्पादन वाढवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी शेतीमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करा. कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या अनेक योजनांचा लाभ घ्या. फार्मर आयडी काढून घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

प्रसाद संकपाळ यांनी जिल्ह्याच्या आपत्कालीन व्यवस्थापनाबाबत माहिती दिली. कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने देशात एकमेव असे समुदायस्थित आपत्ती व्यवस्थापन राबवण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्ह्यात ५०० महिलांची आपदा सखी टीम कार्यरत आहे. ३५० गावात सुमारे ६०० ठिकाणी पब्लिक ॲड्रेस सिस्टीम उभी करण्यात आली आहे. हॅम रेडिओच्या माध्यमातून वायरलेस कम्युनिकेशन साधण्यात येत आहे.

# विजयपूर जिल्हा पोलिसांकडून रुपये ७ कोटींपेक्षा अधिक किमतीची मालमत्ता हस्तगत, संबंधितांना परत

**। ललकार वृत्त ।**

विजयपूर दि. २६ (वार्ताहर) – जिल्ह्यात २०२४-२५ या आर्थिक वर्षात, जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या २२५ मालमत्ता चोरीच्या प्रकरणांमध्ये एकूण ३४५ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून सुमारे ७ कोटींपेक्षा अधिक किमतीच्या मालमत्ता हस्तगत करण्यात आल्या. या वस्तू संबंधितांना परत करण्यात जिल्हा पोलिस यशस्वी ठरले आहेत.

शुक्रवारी जिल्हा पोलिसांच्या वतीने विजयपूर शहरातील जिल्हा पोलिस परेड मैदानावर आयोजित 'प्रॉपर्टी रिटर्न परेड' मध्ये जिल्हा पोलिस अधीक्षक लक्ष्मण निंबरगी यांच्या नेतृत्वाखाली चोऱ्यांमध्ये गमावलेले सोनं व इतर वस्तू वारसांना परत करण्यात आल्या.

सोने चोरी प्रकरणे : गेल्या एका वर्षात जिल्ह्यात ९७ सोनं चोरीच्या प्रकरणांमध्ये १५२ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून एकूण ५१४५.०२ ग्रॅम सोनं व १७२३ ग्रॅम चांदीचे दागिने, एकूण किंमत छ२,३९,८५,११० इतकी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

वाहन चोरी प्रकरणे : जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांत दाखल ७३ दुचाकी चोरी प्रकरणांत १०२ आरोपींना अटक करून २५१ दुचाकी (किंमत छ१,०६,७२,०००) हस्तगत करण्यात आल्या.

चारचाकी चोरीच्या १४ प्रकरणांत १९ आरोपींना अटक करून १२ चारचाकी वाहने (किंमत छ१,३२,४१,०००) जप्त करण्यात आली.

टिप्पर चोरीच्या प्रकरणांत ५ आरोपींना अटक करून २ टिप्पर (किंमत छ१९,००,०००) पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

रोख व इतर चोरी प्रकरणे : जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये दाखल १९ रोख चोरीच्या प्रकरणांतून ३१ आरोपींना अटक करून छ१,९१,८९,४०४ रोख हस्तगत करण्यात आली आहे.



इतर २१ चोरीच्या प्रकरणांतून ३६ आरोपींना अटक करून १४३ वस्तू, एकूण किंमत छ१२,४२,२५०, हस्तगत करण्यात आली.

एकूण ७,०२,२९,७६४ किमतीच्या जप्त मालमत्तांपैकी छ३,४६,०८,१०० किमतीची मालमत्ता वारसांना परत करण्यात आली असून, उर्वरित छ३,५६,२१,६६४ किमतीच्या वस्तू न्यायालयाच्या परवानगीने लवकरच वारसांना परत करण्यात येतील, अशी माहिती एसपी लक्ष्मण निंबरगी यांनी दिली.

या कार्यक्रमास ॲडिशनल एसपी शंकर मारीहाल, रामनगौड हत्ती, डीवायएसपी बसवराज यलिगार, बळप्पा नंदगावी, सुनील कांबळे, तुळजाप्पा सुल्फी, एच.एस. जगदीश व विविध पोलिस ठाण्यांचे सीपीआय, पीआय, पीएसआय व कर्मचारी उपस्थित होते.

पोलिस विभाग सर्व प्रकारच्या जनसेवेसाठी सदैव तत्पर आहे. जनतेने आपल्या घरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. सीसीटीव्ही असल्यास चोरीचे प्रकार शोधणे सुलभ होते. प्रत्येक घर, रस्ता, गल्ली, गावांमध्ये सीसीटीव्ही आणि वाहनांमध्ये ट्रॅकिंग टूल बसवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. फसवणुकीच्या प्रकरणात लोभ व हव्यास हे मुख्य कारण असल्याने नागरिकांनी सावध राहावे. गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिस विभागासोबत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पोलिस प्रमुख लक्ष्मण निंबरगी यांनी केले.

## सुडोकु

आपले थोडे डोके वापरा आणि करा नंबरची अदला बदल.जेवढया लवकर आपण हे कोडे सोडवाल तेवढे आपल्याला हुषार समजण्यात येईल.

**खेळाचे नियम :-** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतू ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे.प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 | 5 | | | | 7 | |
| 2 | | | | 6 | 9 | 1 | 8 | 3 |
| | | | | 7 | | | | 9 |
| 9 | 6 | 5 | | | 8 | 4 | | |
| | | 2 | | | | 9 | | |
| | | 4 | 6 | | | 7 | 5 | 2 |
| 5 | | | | 1 | | | | |
| 7 | 1 | 3 | 2 | 8 | | | | 5 |
| | 2 | | | | 6 | 3 | | |

**कालच्या कोडयाचे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 9 | 2 | 3 | 5 | 7 | 4 | 1 | 8 |
| 8 | 3 | 7 | 1 | 9 | 4 | 6 | 2 | 5 |
| 1 | 4 | 5 | 6 | 8 | 2 | 7 | 9 | 3 |
| 2 | 1 | 9 | 8 | 7 | 6 | 5 | 3 | 4 |
| 7 | 6 | 4 | 5 | 3 | 9 | 2 | 8 | 1 |
| 5 | 8 | 3 | 2 | 4 | 1 | 9 | 7 | 6 |
| 3 | 7 | 6 | 9 | 1 | 5 | 8 | 4 | 2 |
| 9 | 5 | 1 | 4 | 2 | 8 | 3 | 6 | 7 |
| 4 | 2 | 8 | 7 | 6 | 3 | 1 | 5 | 9 |

## के-लॉटरी

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| 178 62 480 | 137 10 136 | 680 49 478 | 456 51 470 | 470 19 379 | 456 56 367 |
| + | + | 369 80 136 | 348 52 147 | 170 84 590 | 350 87 179 |
| 140 51 489 | 577 91 128 | 257 41 137 | 456 57 377 | 588 19 478 | 379 95 258 |
| 460 05 168 | 667 90 479 | 557 74 770 | 136 06 259 | 119 19 234 | 268 63 689 |
| 379 90 280 | 346 34 400 | 260 82 200 | 370 09 144 | 589 28 260 | 137 19 577 |
| 467 72 480 | 337 34 347 | 138 21 380 | 580 32 156 | 156 21 489 | 158 42 129 |
| 168 58 170 | 224 84 347 | 488 00 299 | 114 67 359 | 677 06 277 | 667 98 378 |
| 479 03 157 | 468 82 589 | 679 29 667 | 379 90 226 | 560 14 455 | 114 66 367 |
| 578 02 589 | 699 40 235 | 199 92 345 | 116 85 780 | 569 00 136 | 800 88 260 |
| 580 39 144 | 379 94 257 | 229 33 599 | 447 58 125 | 344 11 470 | 178 63 337 |
| 388 91 100 | 178 69 134 | 358 60 127 | 449 71 128 | 350 85 267 | 390 20 370 |
| 180 95 357 | 138 28 279 | 236 11 588 | 679 29 270 | 390 28 350 | 470 18 189 |
| 257 47 458 | 800 83 148 | 149 45 357 | 260 80 145 | 256 33 689 | 489 18 369 |
| 289 96 349 | 589 25 267 | 250 78 369 | 690 59 478 | 580 30 550 | 270 94 167 |
| 136 08 189 | 267 55 357 | 280 04 239 | 678 14 149 | 159 55 690 | 348 51 678 |
| 359 71 470 | 336 27 179 | 480 21 155 | 679 23 670 | 180 95 348 | 138 29 225 |
| 255 21 137 | 470 19 900 | 247 33 788 | 399 17 179 | 269 76 556 | 224 84 455 |
| 447 57 269 | 367 65 267 | 136 06 457 | 180 97 179 | 270 93 337 | 690 53 120 |
| 778 21 588 | 460 01 669 | 558 80 677 | 300 39 289 | 129 20 460 | 370 01 128 |
| 789 49 568 | 125 89 469 | 369 83 157 | 156 29 180 | + | 130 44 789 |
| 558 82 778 | 244 01 290 | 579 14 347 | 120 33 788 | 160 70 677 | 588 13 670 |
| 111 33 139 | 677 00 334 | 470 10 550 | 890 79 289 | 257 41 155 | 234 96 556 |
| 128 12 336 | 460 04 356 | 880 66 367 | 178 61 560 | 169 62 138 | 235 02 679 |
| 180 91 588 | 247 31 119 | 789 44 239 | 277 63 670 | 345 23 238 | 469 93 689 |
| 257 40 359 | 270 96 268 | 169 62 570 | 558 80 226 | 489 15 168 | 359 76 240 |
| 247 35 500 | 469 91 335 | 149 44 248 | 299 08 459 | 490 34 789 | 257 46 268 |

## एम-लॉटरी

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र |
|---|---|---|---|---|
| 800 89 568 | 138 20 118 | 179 73 599 | 680 41 227 | 478 99 135 |
| + | + | 278 72 390 | 299 06 123 | 179 70 280 |
| 117 95 799 | 679 23 166 | 190 08 134 | 880 62 129 | 157 36 600 |
| 589 23 148 | 148 36 123 | 129 23 490 | 889 59 144 | 448 67 124 |
| 246 21 290 | 136 05 113 | 139 34 239 | 168 54 257 | 599 36 457 |
| 689 38 558 | 144 98 990 | 138 27 269 | 345 27 458 | 249 52 147 |
| 448 60 190 | 279 85 230 | 345 24 257 | 123 67 269 | 250 72 444 |
| 290 16 259 | 460 00 136 | 260 81 146 | 125 83 256 | 236 16 268 |
| 670 38 189 | 477 86 556 | 267 53 490 | 699 45 799 | 390 24 789 |
| 190 06 123 | 277 69 117 | 134 80 550 | 689 36 556 | 260 81 470 |
| 780 55 230 | 470 16 268 | 155 14 130 | 560 12 679 | 480 20 145 |
| 380 12 138 | 690 51 136 | 129 21 146 | 380 10 578 | 149 49 333 |
| 690 55 177 | 226 04 266 | 679 28 369 | 900 91 146 | 156 20 479 |
| 358 66 457 | 469 96 448 | 480 28 279 | 337 33 120 | 157 33 689 |
| 367 68 189 | 589 26 556 | 270 96 790 | 880 64 239 | 115 78 134 |
| 269 70 280 | 239 46 448 | 158 46 358 | 148 35 780 | 128 10 479 |
| 156 29 388 | 250 71 290 | 479 05 456 | 249 59 225 | 890 76 150 |
| 360 99 379 | 344 14 130 | 568 97 458 | 336 29 126 | 367 65 113 |
| 477 80 677 | 900 99 568 | 580 33 238 | 456 57 458 | 336 27 126 |
| 360 96 277 | 128 16 268 | 337 35 348 | 166 37 467 | + |
| 369 89 135 | 236 16 790 | 334 03 139 | 347 44 590 | 124 76 367 |
| 790 69 180 | 457 67 890 | 577 93 599 | 277 60 145 | 580 39 126 |
| 780 50 244 | 190 07 449 | 128 16 240 | 589 27 115 | 134 82 499 |
| 339 53 670 | 115 70 244 | 258 50 145 | 457 68 459 | 589 23 256 |
| 779 38 350 | 446 45 140 | 155 13 120 | 136 03 779 | 112 47 124 |
| 269 09 289 | 559 90 244 | 269 79 180 | 568 90 226 | 460 00 136 |

## आजचे पंचांग

रविवार/२७ एप्रिल २०२५
विक्रम संवत्- २०८१
चैत्र शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- उत्तराणायण
मास-चैत्र / ऋतु-ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:अमावस्या २५:००:५६+
नक्षत्र:अश्विनी २४:३८:३४+
योग:प्रीति २४:१८:५२+
करण:चतुष्पाद १४:५६:१४
करण:नाग २५:००:५६+
सूर्य:मेष
चन्द्र:मेष०३:३८:४३
हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास -शव्वाल
तारीख - २८
विशेष-चैत्र अमावास्या
दर्श अमावास्या
नारायणस्वामी पुण्यतिथी - नृसिंहवाडी
अमवास्या समाप्ती उ. रात्रौ १.०१

## इतिहासात आजचा दिवस

**राष्ट्रीय**

१५२६ – मुगल घराण्यातील बाबर दिल्लीचा स्वयंघोषित बादशहा बनला.
१८५३ – मुंबई-पुणे पहिली रेल्वे सुरू.
१८५४ – मुंबई-पुणे तारायंत्राद्वारे संदेशवहन सुरू.
१८७८ – महिलांना भारतात प्रथमच कलकत्ता विद्यापीठात प्रवेश देण्यास सुरुवात.
१९५१ – सोमनाथ मंदिर सर्वांसाठी खुले करण्यात आले.
१९६२ – लोकल बोर्डाच्या जागी जिल्हा परिषदांची स्थापना.
२००३ – वैमानिकरहित लक्ष्यभेदी विमान 'लक्ष्य'चे यशस्वी उड्डाण.
२००४ – राष्ट्रपती व सरन्यायाधीशांविरुद्ध अजामीनपत्र वॉरंट उच्च न्यायालयाने रद्द केले.

## - सुविचार -

चिडून हत्तीला कधी जिंकता येत नाही. – **जॉन विलमॉट**

संस्कृत सुभाषित

मज समग्राते जाणसी ऐसे । आपुलिया तळहाताचे रत्न जैसे।
अर्जुना तया नाव ज्ञान । येर प्रपंचु हे विज्ञान । तेथे सायाबुद्धी ते अज्ञान । हेही जाण

अर्थ : प्रपंचविज्ञान हेच सत्य मानणे याला, ज्ञानेश्वर माऊली अज्ञान म्हणतात. मला म्हणजे भगवंताला सामग्र्याने जाणणे, ते खरे ज्ञान म्हणतात. हे ज्ञान जाणणे, हेच जन्माचे सार्थक, बाकी सारे निरर्थक !

## उपदेश कथा

### सुख दुःख

जसा आपला दृष्टिकोन तसं आपलं जीवन. याचा प्रत्यय देणाऱ्या अनेक घटना पदोपदी घडत असतात. फक्त त्या आपल्या लक्षात येत नाहीत. आता हेच पाहा ना. फक्त दोन संवाद आहेत पण केवढं मर्म सांगून जातात. जगद्विख्यात विचारवंत सॉक्रेटिसकडे एक तरुण गेला व म्हणाला, 'सर, मला लग्न करायचं आहे, तुमचा सल्लाद्याल?' सॉक्रेटिस म्हणाले, 'तुला लग्न करायचं आहे ना तर अवश्य कर. सद्गुणी, चांगली पत्नी तुला लाभली तर तुझा संसार सुखाचा होईल आणि जर आक्रस्ताळी, भांडकुदळ बायको लाभली तर माझ्यासारखा तत्ववेत्ता होशील. म्हणजे दोन्हीवेळी सुखच सुख.

असाच एक तरुण हाच प्रश्न घेऊन विश्वकवी रवींद्रनाथ टागोरांकडे गेला. त्याने विचारले, 'गुरुदेव, मी लग्न करू की नको?' मिश्किलपणे गुरुदेव म्हणाले, 'अरे तुला वाटेल तर कर. काहीही कर. तुला पश्चातापच होईल. म्हणजेच लग्न केले तरी दुःख आणि नाही तरी दुःख!' आता खरे कोणाचे मानायचे ?

कथा उपदेश : दोन्ही उत्तरे वेगळी पण अर्थ एकच आहे. आपल्या पाहण्याच्या दृष्टिकोनावर सुख दुःख या कल्पना अवलंबून असतात.

## राशीभविष्य

**मेष :** तुम्ही जरी सध्या अडचणीत असलात तरी इतरांना उत्तम मार्गदर्शन करू शकाल. तुमची जिद्द, तुमची चिकाटी व तुमचा आत्मविश्वास जास्तीत जास्त वृद्धींगत होणार आहे. तुम्हाला एखादा छोटासा प्रवास करावा लागेल. काहींना गुरुकृपा लाभेल.

**वृषभ :** आजचा पूर्ण दिवस तुम्ही तुमच्या जोडीदाराकरीता राखून ठेवणार आहात. वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव वाढेल. उत्साहाने व आनंदाने सुट्टीचा दिवस घालवाल. मनोरंजन व करमणुकीसाठी खर्च कराल.

**मिथुन :** मन:शांती लाभेल. मानसिक प्रसन्नता, उत्साह आज तुमच्या प्रत्येक कृतीतून जाणवेल. राहत्या जागेच्या समस्या सोडवू शकाल. व्यवसायामध्ये अधिकाधिक लक्ष घालाल व नव्या कल्पना अंमलात आणाल.

**कर्क :** तुम्ही तुमच्या मुला-मुलींकडे अधिक लक्ष देणार आहात. त्यांच्या ज्या काही समस्या असतील त्या सोडवू शकाल. मित्र-मैत्रिणींच्या गाठीभेटी पडतील. व्यवसायात आर्थिक लाभ होतील.

**सिंह :** गेल्या दोन दिवसांपेक्षा आजचा दिवस उत्साहवर्धक आहे. घरकामांकडे अधिक लक्ष द्याल. आज आपण जे काम हाती घ्याल ते उत्साहाने पूर्ण करणार आहात. आरोग्य उत्तम राहील. मन आनंदी व आशावादी बनेल. कठोर भूमिका टाळावीच लागेल.

**कन्या :** व्यवसायामध्ये नवी दिशा सापडेल. प्रवासाचे, लहानशा सहलीचे बेत आखाल व त्यांचा आनंद घ्याल. मात्र अतिउत्साह नको. मनोबल व आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. एखादा भाग्यकारक अनुभव येईल. काहींना गुरूकृपा लाभेल.

**तुळ :** जुने मित्र-मैत्रिणी भेटतील व जुन्या ओळखींना उजाळा मिळेल. प्रेमीजन प्रिय व्यक्तीच्या सुखद सहवासाने आनंदून जातील. संततीचे प्रश्न, त्यांच्या शैक्षणिक समस्या मार्गी लावू शकाल. संततीसौख्य उत्तम लाभेल.

**वृश्चिक :** मनाची घालमेल होणाऱ्या काही घटना घडतील. वैवाहिक जोडीदाराकडून एखादा मनस्ताप संभवतो. व्यवसायामध्ये समाधानकारक स्थिती राहील. निराशाजनक विचार मनात येतील. प्रवास आज नकोत. निर्णय घेण्याचे टाळावे.

**धनु :** आपण मुळातच धार्मिक वृत्तीचे असता. आज आपणाला एखाद्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल. सत्संग घडेल. पूजा, ध्यान-धारणा यामध्ये वेळ व्यतीत कराल. हितशत्रूंची पीडा जाणवणार नाही.

**मकर :** तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा इतरांवर प्रभाव पडणार आहे. आज तुम्ही सार्वजनिक व सामाजिक कार्यांकडे अधिक लक्ष देणार आहात. प्रतिष्ठा, मान-सन्मानाचे योग येतील. व्यवसायातील उलाढाल वाढवू शकाल.

**कुंभ :** व्यवसायामध्ये तुम्हाला विशेष आर्थिक लाभ होणार आहेत. उधारी वसुलीची कामे आज तुम्ही नेटाने पूर्ण कराल. व्यवसायातील महत्त्वाचे करार करणेस हरकत नाही. काहींना एखादी महत्त्वाची बातमी समजेल.

**मीन :** आज तुमच्या सुट्टीचा पुरेपूर उपभोग घेणार आहात. कोणतेही काम करायला मन तयार होणार नाही. निरुत्साह जाणवेल. त्यामुळे घरात चिडचिड होण्याची शक्यता आहे. व्यवसायामध्ये हितशत्रूंवर मात कराल. प्रकृतीच्या तक्रारी जाणवू शकतात. प्रवास आज नकोत.














Printed, Published and Owned by Mr. Subhash Bapurao Kharade and printed and published at M/s. Kharade Offcet Printer's, Lalkar Bhavan, C.S.No. 466/1, Plot No. 32, Patrakar Nagar, Near S.T. Stand, Sangli, Tal. Miraj, Dist. Sangli 416416. Editor : Mr. Subhash Bapurao Kharade R.N.I. MAHMAR/1996/07711, **E-mail :** lalkarsangli @ gmail.Com

दैनिक ललकार हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक व संपादक **श्री.सुभाष बापूराव खराडे** यांनी छापून प्रकाशित केले★**मुद्रण व प्रकाशन स्थळ :** मे खराडे ऑफसेट प्रिंटर्स ललकार भवन, सि.स.नं. ४६६/१ प्लॉट नं. ३२ पत्रकारनगर, एस.टी. स्टॅन्डजवळ, सांगली – ४१६४१६, फोन – (०२३३) २५३०२७८, मो. ९८२३१४७४५८ ★मुंबई संपर्क कार्यालय : रविंद्र बी. खांडेकर २६५, बाजार गेट, पहिला मजला फोर्ट-मुंबई ४००००१ फोन २२६५२१४७ ★ पुणे संपर्क कार्यालय : नरेंद्र शिंदे, भार्गव सोसायटी एफ-४ दुसरा मजला, नं. ३४३-बी शनिवार पेठ, पुणे ३० फोन ५६००४१९५ ★या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती, इत्यादीशी संपादक, मुद्राक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. R.N.I. : MAHMAR/1996/07711, Email : lalkarsangli@gmail.com (सांगली-न्याय कक्षेत)

हसत खेळत अन्यायाचा प्रतिकार करणारे स्वतंत्र विचाराचे हिरक महोत्सवी दैनिक

# ललकार

रविवार, दि.२७ एप्रिल २०२५ | पान नं. ८

### सिव्हील हॉस्पिटल आवारातून दुचाकी चोरीला

सांगली, दि.२६ (प्रतिनिधी)- शासकीय सर्वोपचार रुग्णालयातील क्षयरोग विभागाच्या दारात उभी केलेली दुचाकी चोरीला गेली आहे. याप्रकरणी इरफान अब्दुलरहमान नदाफ (रा. कुपवाड एमआयडीसी) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात नोंद केली आहे. फिर्यादी इरफान नदाफ हे वसंतदादा सर्वोपचार रुग्णालयातील क्षयरोग विभागात आले होते. त्यावेळी त्यांच्या मालकीची एमएच १० एक्स ५८२६ ही दुचाकी चोरून नेण्यात आली आहे.

### चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

सांगली, दि.२६ (प्रतिनिधी) - इस्लामपूर रोडवरील कसबे डिग्रज येथील राज पेट्रोलपंपासमोर रस्त्याच्या दुभाजकाजवळ उभ्या असलेल्या दुचाकीस्वारास चारचाकीने जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार विजय जगन्नाथ इदाते (वय २७, रा. कापूसखेड नाका, इस्लामपूर) गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी चारचाकी चालकाविरूध्द सांगली ग्रामीण पोलीसात गुन्हा दाखल केला आहे.

# राहिबाई पोपेरे यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान; विजयमाला कदम यांची बीजतुला

## सह्याद्री देवराईच्या कार्यास डॉ. विश्वजीत कदम यांच्याकडून २५ लाख रुपयांची मदत जाहीर

। ललकार वृत्त ।

पुणे, दि.२६ (वार्ताहर) - सध्याच्या काळात आपण काय खातो, मुलांना काय खायला देतो याचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. विषयुक्त अन्नधान्यामुळे अनेक आजार वाढले आहेत. आरोग्य टिकविण्यासाठी देशी वाणाचा वापर करा, विषमुक्त अन्न खा, पुन्हा निसर्गाकडे चला असा संदेश देत माझ्या कार्यामुळे प्रत्येकाचे ताट विषमुक्त झाल्यास माझ्या कार्याचे चीज होईल, असे उद्गार पद्मश्री राहिबाई पोपेरे यांनी काढले. मुलांना फक्त पुस्तकी ज्ञान नको तर निसर्गाचे, काळ्या मातीचे ज्ञान द्यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सह्याद्री देवराई व भारती विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील पहिले दोन दिवसीय बीज संमेलन विद्यापीठाच्या धनकवडी शैक्षणिक संकुलात आयोजित करण्यात आले होते. अनेक प्रकारच्या बियांचे देशी वाण जपण्यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या बीजमाता पद्मश्री राहिबाई



राहिबाई पोपेरे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना आचार्य पंडित मुकुल शिवपुत्र. समवेत स्वप्नाली कदम, डॉ. विश्वजीत कदम, सयाजी शिंदे, विजयमाला कदम, डॉ. अस्मिता जगताप.

पोपेरे यांचा संमेलनाच्या समारोप समारंभात जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. ख्यातनाम ज्येष्ठ शास्त्रीय गायक आचार्य पंडित मुकुल शिवपुत्र यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. एक लाख रुपये व सन्मान पत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. भारती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या बियांतून भारती विद्यापीठ शालेय समितीच्या अध्यक्षा विजयमाला पतंगराव कदम यांची या वेळी बीजतुला करून व सन्मानपत्र देऊन त्यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानाविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्या बीजातून रोपवाटिका तयार करण्यात येणार असून यारोपांचीलागवडकडेगावयेथीलभारती विद्यापीठाच्या कृषिमहाविद्यालयाच्या जागेत करून त्या देवराईची देखभाल भारती विद्यापीठातील विद्यार्थी करणार आहेत.

भारती विद्यापीठाचे कार्यवाह व भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आमदार डॉ. विश्वजीत कदम, भारती विद्यापीठ रवींद्रनाथ टागोर स्कूल ऑफ एक्सलन्सच्या अध्यक्षा स्वप्नाली कदम, भारती विद्यापीठ शालेय समितीच्या अध्यक्षा विजयमाला पतंगराव कदम, सह्याद्री देवराईचे अध्यक्ष सयाजी शिंदे, उपाध्यक्ष अरविंद जगताप, नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य, संगीत दिग्दर्शक शैलेश निसर्गंध, भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, उपवन संरक्षक महादेव मोहिते मंचावर होते.

सयाजी शिंदे म्हणाले, बीज संमेलनाचा मुख्य उद्देश राज्यातील शाळा आणि महाविद्यालय तसेच विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निसर्ग आणि पर्यावरणाची गोडी लावणे, त्यांना केवळ भाषण न देता कृतिशील सहभाग घ्यायला लावणे. तसेच आपल्या झाडांची आणि



विजयमाला कदम यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करताना आचार्य पंडित मुकुल शिवपुत्र. समवेत स्वप्नाली कदम, डॉ. विश्वजीत कदम, सयाजी शिंदे, राहिबाई पोपेरे, डॉ. अस्मिता जगताप.

बियांची ओळख करून देणे, ती झाडे वाढवण्यासाठी त्यांच्या देखभालीसाठी सक्रिय राहणे हा आहे. झाडाला देव मानून झाडे लावा, वाढवा आणि जगवा असा संदेशही त्यांनी दिला.

बीजतुला होणे हा माझ्या आयुष्यातील हृद्य प्रसंग आहे असे सांगून विजयमाला कदम म्हणाल्या, वृक्षाला आईच्या रूपात पाहून तिची छत्रछाया अखंडितपणे मिळत रहावी या हेतूने बीजतुला करण्यात आली. यातून संकलीत झालेल्या बीजांमधून निर्माण झालेली देवराई पुढच्या अनेक पिढ्यांना प्रेमाची छाया देईल. डॉ. पतंगराव कदम यांनी लावलेल्या शिक्षणाच्या बीजाचा आज मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे आणि त्याची फळे-फुले विद्यार्थ्यांना लाभली आहेत याचा विशेष आनंद आहे.

डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, डॉ. पतंगराव कदम यांनी आखून दिलेल्या मार्गावर चालताना चांगल्या गोष्टींना मदत करण्याचा प्रयत्न करत आहे. संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असूनही सामाजिक बांधिलकी सोडलेली नाही. यातूनच डॉ. पतंगराव कदम फाऊंडेशनच्या माध्यमातून सह्याद्री देवराईच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग असेल, अशी ग्वाही देत २५ लाख रुपयांचे देणगी जाहीर केली.

आचार्य मुकुल शिवपुत्र यांनी राहिबाई पोपेरे यांच्या कार्याचे कौतुक करून सावा भाताचे बीज भेट दिले. विजयमाला कदम यांच्या बीजतुला उपक्रमाविषयी विशेष आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाचा प्रारंभ विद्यार्थ्यांनी काढलेल्या वृक्ष दिंडीने झाला. भारती विद्यापीठाच्या विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्त्व पटवत नृत्य सादरीकरण केले. अरविंद जगताप यांनी प्रास्ताविकपर स्वागत केले. डॉ. तेजस्वीनी बाबर यांनी आभार मानले.

## मगर मठीमध्ये आदिमाया रूपात स्वामींची पूजा

### आकर्षक ५५१ आंब्यांची आरास

। ललकार वृत्त ।

कोल्हापूर, दि.२६ (वार्ताहर) - संभाजीनगर येथील श्री स्वामी समर्थ महाराज मगर मठीमध्ये महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली. श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथीनिमित्त श्री स्वामी समर्थ महाराज मगरमठी येथे गेले तीन दिवस अखंड विना सप्ताह सोहळा, नित्य पूजा, अभिषेक, जप, भजन असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

उत्सवाच्या शेवटच्या दिवशी सकाळी अभिषेक, आरती, जप होऊन रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याचा मोठ्या प्रमाणात भक्तांनी लाभ घेतला. दरम्यान, यावेळी आदिमाया रूपात आकर्षक अशी ५५१ आंब्यांची आरास करण्यात आली होती. यासाठी श्रीकांत मगर, रवी शिंदे, रोहन सुतार, सारंग पाटील, कुणाल कांबळे, राहुल बामणे,



संदीप कदम, सनी कोरे, प्रशांत जाधव यांनी पूजा बांधली.

## काश्मीरातील पाच दहशतवाद्यांची घरे ब्लास्ट करुन उद्ध्वस्त

मुंबई, दि.२६ (वृत्तसंस्था) - पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने काश्मीरमध्ये लपून बसलेल्या दहशतवाद्यांबाबत कठोर धोरण अवलंबल्याचे दिसून येतंय. आधी दोन दहशतवाद्यांची घरं उद्ध्वस्त केल्यानंतर आता आणखी तीन दहशतवाद्यांची घरे भारताने जमीनदोस्त केली. पुलवामा भागात एहसान उल हक शेख या दहशतवाद्याचं, कुलगाममध्ये झकीर अहमद गानियाचे तर शोपियाँमध्ये शाहीद अहमद कुटे या दहशतवाद्याचे घर पाडण्यात आले. दरम्यान शुक्रवारी आसिफ शेख आणि आदिल गुरी याचे घर पाडले होते.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून आक्रमक पाऊलं उचलली जात आहेत. सोफियान येथील छोटीपूरा येथील लष्कर ए तोएबा या संघटनेत सक्रिय असलेल्या शाहिद अहमद कुट्टी याचे घर आयआयडी ब्लास्ट लावून उडवण्यात

### पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कर आक्रमक



आले. शहिद हा मागील दोन वर्षांपासून या संघटनेत सक्रिय असल्याची माहिती आहे. त्याचा भाऊही दोन वर्षांपासून तुरूंगात असल्याची माहिती शेजाऱ्यांनी दिली.तर शाहिदचे वडील हे सध्या ताब्यात आहेत. तपास यंत्रणेचे अधिकारी काल शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास आले होते. कुटुंबीयांना ताब्यात घेतल्यानंतर रात्री १ च्या सुमारास या दहशतवाद्यांच्या घरी ब्लास्ट करून ते उद्ध्वस्त करण्यात आले.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर लष्कराचे जवान ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. काश्मीरच्या बांदिपोरा भागात कुलनार इथे चकमकीत एक दहशतवादी ठार मारण्यात आला. तर दोन सैनिक जखमी झालेत. परिसराला वेढा घालून अजूनही शोध मोहीम सुरू आहे. काश्मीरच्या शोपियान आणि पहलगाममध्ये घरांची झडती सुरू आहे. शेकडो संशयित ताब्यात घेण्यात आले आहेत.

पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांची हत्या केल्यानंतर पाच दहशतवादी हे पुन्हा पाकिस्तानात गेले असल्याची माहिती आहे. पाकिस्तानमधून पहलगाममध्ये येण्यासाठी या दहशतवाद्यांना सुमारे आठ तास लागले असावेत, अशी माहिती समोर आली. तर परत जाण्यासाठी देखील जवळपास तेवढाच वेळ लागला असावा. त्या हिशेबानं रात्री दहा ते अकराच्या दरम्यान त्यांनी पाकिस्तानच्या हद्दीत प्रवेश केला असावा अशी शक्यता आहे.

## सिंधू नदीत एकतर पाणी वाहणार, नाहीतर रक्ताचे पाट...

### बिलावल भुट्टोंसह पाकच्या पंतप्रधानांनी ओकली गरळ

दिल्ली, दि.२६ (वृत्तसंस्था) - जम्मू काश्मीरच्या पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यानं अनेक निष्पापांचा बळी घेतला आणि जगभरातून या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. फक्त भारतच नव्हे, तर इतरही अनेक मित्र राष्ट्रांनी या हल्ल्याचा निषेध करत पाकिस्तानविषयीसुद्धा नाराजीचा सूर आळवला. इथं भारताकडून दहशतवादी कारवायांना मिळणाऱ्या प्रोत्साहानाचा निषेध करत अनेक करार आणि सीमाभागातून होणारे व्यवहार रद्द करण्यात आले. ज्यामुळं पाकिस्ताननंही भारताविरोधात जाहीर भूमिका घेतली.

एका जाहीर सभेमध्ये उपस्थितांना संबोधित करताना भुट्टो यांनी सिंधू जल करारासंदर्भात भाष्य करत भारताला थेट इशारा दिला. 'मी सिंधू नदीच्या काठावर उभा राहून भारताला स्पष्टपणे सांगतोय की,



सिंधू (नदी) आमची आहे आणि आमचीच राहील. एकतर या नदीतून आमचं पाणी वाहील नाहीतर मग इथं आमच्याच रक्ताचे पाट वाहतील...', असं भुट्टो म्हणाले.

बिलावल भुट्टो जरदारी यांच्या या चिथावणीखोर वक्तव्यानंतर परिस्थिती आणखी चिघळली जाण्याची भीती अनेक जाणकारांनी व्यक्त केली. पाक नेते भुट्टो यांनी भारतानं सिंधूवर हल्ला केल्याचं म्हणत देशाला हल्लेखोर म्हटलं. भारताची लोकसंख्या आमच्याहून जास्त असेल मात्र पाकिस्तानचे लोक धाडसी आहेत. आम्ही सीमेवर आणि पाकिस्तानातही लढा देऊ, असं सांगत आमचा आवाजच भारताला सडेतोड उत्तर देईल याचाच पुनरुच्चार त्यांनी केला.

पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनीसुद्धा सिंधू जल करारासंदर्भातील तणावपूर्ण वातावरणात आपल्या जळजळीत वक्तव्यानं आणखी भर टाकली. 'पाकिस्तानला पुरवले जाणारे पाणी कमी केलं किंवा वळवण्याचा प्रयत्न जरी केला तरी याचं उत्तर पूर्ण ताकदीने दिले जाईल, कोणीही इथं काहीही चूक करुच नये' असं म्हणत शांतता आमची प्राथमिकता असली तरीही अखंडता आणि सुरक्षेच्या बाबतीत आम्ही कोणतीच तडजोड करणार नसल्याची भूमिका मांडत त्यांनीसुद्धा भारताविरोधात सूर आळवला.

## मानहानी खटल्यात राहुल गांधींना पुणे न्यायालयाचे समन्स

पुणे, दि.२६ (वृत्तसंस्था) - वीर सावरकर यांच्या नातेवाईकानं दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात पुण्यातील न्यायालयानं लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना समन्स बजावले आहे. राहुल गांधी यांनी लंडन दौऱ्यावर असताना वीर सावरकरांबद्दल वक्तव्य केल्यानं त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. राहुल गांधी यांना न्यायालयानं ९ मे २०२५ रोजी हजर राहण्यास सांगितलं आहे.

वीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी एप्रिल २०२३ मध्ये पुणे न्यायालयात राहुल गांधी यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. यानंतर पुणे न्यायालयानं अनेकदा राहुल गांधी यांना हजर राहण्यासाठी समन्स बजावले होते. आता देखील न्यायालयात हजर राहण्यासाठी पुणे न्यायालयानं राहुल गांधी यांना समन्स बजावले आहे.

मार्च २०२३ मध्ये राहुल गांधी यांनी लंडनमधील



भाषणात सावरकरांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. त्यावेळी राहुल गांधींनी म्हटलं, "एका पुस्तकात लिहिलंय की सावरकर आणि त्यांच्या पाच ते सहा मित्रांनी एकदा एका विशिष्ट समुदायातील माणसाला मारहाण केली. त्यामुळं सावरकर यांना आनंद वाटला." प्रत्यक्षात राहुल गांधी यांनी केलेल्या दाव्यानुसार सावरकरांनी तसे म्हटल्याचे कुठल्याही पुस्तकात लिहिले नाही, असा सात्यकी यांनी याचिकेत म्हटलं आहे. यानंतर राहुल गांधी यांच्याविरोधात पुणे न्यायालयात खटला दाखल केला होता.


राहुल गांधी यांनी वीर सावरकर यांच्याविरोधात 'भारत जोडो यात्रे'त वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं देखील राहुल गांधींना चांगलंच फटकारलं.

## पहलगामच्या भ्याड हल्ल्यानंतर भारतीय नौदलाकडून पाकिस्तानची झोप उडवणारी पोस्ट

दिल्ली, दि.२६ (वृत्तसंस्था)- जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला, ज्यात भारतीय नौदलाचे लेफ्टनंट विनय नरवाल यांचाही समावेश होता. या हल्ल्यानंतर भारताने केवळ कडक राजनैतिक पावले उचलली नाहीत तर आपल्या लष्करी सामर्थ्याचे देखील प्रदर्शन केले आहे.

आता भारतीय नौदलाने २६ एप्रिल रोजी त्यांच्या अधिकृत एक्स अकाउंटवर समुद्रात एकत्र गस्त घालणाऱ्या पाच युद्धनौकांचा फोटो शेअर केला आहे. या छायाचित्रातून एक स्पष्ट संदेश देण्यात आला की, भारतीय नौदल कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी नेहमीच तयार आहे. पोस्टमध्ये "एकतेतील ताकद; उद्देशपूर्ण उपस्थिती" असे कॅप्शन लिहिण्यात आले आहे. तर #MissionReady आणि #Anytime AnywhereAnyhow सारखे हॅशटॅग देखील वापरण्यात आले आहे. भारतीय नौदलाची पोस्ट सध्या सोशल मिडियावर जोरदार व्हायरल होत आहे.

दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक



कठोर पावले उचलली आहेत. त्यापैकी सर्वात प्रमुख म्हणजे सिंधू नदी पाणी कराराला स्थगिती आणि अटारी सीमा चौकी बंद करणे. तर पाकिस्तानने भारताशी असलेले सर्व व्यापारी संबंध तोडण्याचा आणि ते युद्धाचे कृत्य म्हणून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. यानंतर भारताने केवळ लष्करी पातळीवर तयारी वाढवली नाही तर राजनैतिक पातळीवरही पाकिस्तानवर दबाव आणण्यास सुरुवात केली. या संदर्भात, भारतीय नौदलाने आयएनएस सुरत येथून मध्यम पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली, जी त्यांची उच्च ऑपरेशनल तयारी दाखवत आहे.

आपण भारतीय नौदल आणि पाकिस्तानी नौदलाच्या ताकदीची तुलना केली तर भारतीय नौदल स्पष्टपणे खूप पुढे आहे. भारतीय नौदलाकडे २९३ जहाजे आहेत, ज्यात दोन विमानवाहू जहाजे, आयएनएस विक्रमादित्य आणि स्वदेशी बनावटीची आयएनएस विक्रांत यांचा समावेश आहे. भारताकडे १६ पारंपारिक पाणबुड्या, आयएनएस अरिहंत आणि आयएनएस अरिघाट या दोन अणुऊर्जेवर चालणाऱ्या पाणबुड्या आहेत. त्या तुलनेत, पाकिस्तानकडे फक्त १२१ जहाजे आहेत आणि त्यांच्याकडे एकही विमानवाहू नौका नाही. पाकिस्तानकडे आठ पाणबुड्या आहेत, त्यापैकी बहुतेक जुन्या अगोस्टा वर्गाच्या आणि काही नवीन हेंगशेंग वर्गाच्या पाणबुड्या आहेत. ज्या पाकिस्तानने चीनकडून विकत घेतल्या आहेत आणि अद्याप त्या पूर्णपणे कार्यरत नाहीत.